पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७८ ■ शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

गौतम अदानी सर्वात श्रीमंत

मुंबई : भारतातील आणि आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असणारे रिलायन्स इंडस्ट्रीचे मुकेश अंबानी आता एक पाऊल मागे आले आहेत. 'ब्लूमबर्ग बिलिनेअर इंडेक्स'नुसार, अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी हे आता आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनले आहे. अहवालानुसार, अदानी यांची एकूण संपत्ती आता ९२.६ अब्ज डॉलर्सवर पोहोचलीये. या वर्षात समूहाच्या शेअर्समध्ये सातत्याने वाढ झाल्यामुळे त्यांच्या संपत्तीत तब्बल ८.१ अब्जची भर पडली आहे. जगातील श्रीमंतांच्या यादीत अजूनही ते पहिल्या दहात नसून १९ व्या क्रमांकावर आहेत.

महिला आरक्षण कायदा लागू; रात्री उशिरा अधिसूचना जारी

वृत्तसंस्था १७ एप्रिल

नवी दिल्ली: महिला आरक्षण आणि परिसीमनशी संबंधित तीन विधेयकांवर आज लोकसभेत दुसऱ्या दिवशी चर्चा होईल. पहिल्या दिवशी १३ तास चर्चा झाली. दरम्यान, सरकारने गुरुवारी रात्री उशिरा महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देणारा महिला आरक्षण अधिनियम-२०२३ लागू केला. या संदर्भात केंद्रीय कायदा मंत्रालयाने अधिसूचना जारी केली आहे. अमित शहा आज चर्चेला उत्तर देतील. विधेयकांवर संध्याकाळी ४ वाजता मतदान होईल. दरम्यान, विरोधी पक्षाची संसद परिसरात बैठक होत आहे. यात खरगे, राहुल यांच्यासह अनेक नेते उपस्थित आहेत.

लोकसभा अध्यक्षांनी विधेयकांवर चर्चेसाठी १५ तासांचा वेळ निश्चित केला. गुरुवारी रात्री उशिरा एक वाजेपर्यंत चर्चा चालली. काँग्रेसकडून प्रियंका गांधी, गौरव गोगोई, वेणुगोपाल यांनी विधेयकाच्या विरोधात आपली मते मांडली. प्रियंका म्हणाल्या की, आसामप्रमाणे देशभरातील जागांची फेररचना केली जाईल. पंतप्रधानांनीही सुमारे ३५ मिनिटांचे भाषण दिले. ते म्हणाले की, परिसीमनामध्ये कोणत्याही राज्यासोबत भेदभाव केला जाणार नाही. ही मोदींची हमी आणि वचन आहे. विरोधक याचे श्रेय घेऊ शकतात. भाजपचे एकूण २४२ खासदार आहेत, पण त्यापैकी फक्त ४१ महिला आहेत. राज्यसभेत १०६ खासदार असून, त्यापैकी फक्त १८ महिला आहेत. तुम्ही तुमच्या पक्षातही त्यांचा आदर करत नाही. सत्तेबद्दल बोलायचे असेल, तर आधी त्यांची पूजा करा. तुम्हाला महिला सक्षमीकरणाची काळजी असेल, तर २०२७ च्या उत्तर प्रदेश निवडणुकीत ५०टक्के महिला उमेदवार उभ्या करा.

महिला आरक्षण कायदा १६ एप्रिलपासून

त्यांनी कायदा आणलेला नाही

कल्याण बॅनर्जी म्हणाले, 'केंद्र सरकारने महिला आरक्षण प्रणालीत दुरुस्ती करणारे विधेयक आणले आहे. पण जेव्हा कायदाच लागू झालेला नाही, तेव्हा त्यात दुरुस्ती कशी करता येईल? म्हणूनच, रात्री उशिरा, त्यांनी २०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी करणारी अधिसूचना जारी केली. 'कल्याण बॅनर्जी म्हणाले, 'तुम्ही फक्त रामाची पूजा करता, आम्ही दुर्गा आणि कालीची पूजा करतो' कल्याण बॅनर्जी म्हणाले, 'मोदी, तुम्ही फक्त 'जय श्री राम' म्हणता, पण आम्ही दुर्गा आणि कालीची पूजा करतो. आम्ही 'जय सिया राम' म्हणतो, पण तुम्ही फक्त रामाचेच स्मरण करता. 'मी ओम बिर्ला यांचा आदर करतो. ते खूप चांगले व्यक्ती आहेत. २०२९ च्या निवडणुकीत भाजप सत्तेत येणार नाही. मला सभापतीपदाची जागा राखीव हवी आहे. आम्ही सहमत आहोत, पण ते होणार नाहीत.

कठोरा नाक्याच्या त्या फ्लॅटचा अयान करायचा अय्याशीसाठी वापर!

प्रतिनिधी १७ एप्रिल

अमरावती : शांत आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जिल्ह्याला हादरवून सोडणारे 'व्हिडिओ कांड' आता अधिक गडद होत चालले आहे. परतवाड्याचा मुख्य आरोपी अयान अहमद याने केवळ मुलींचे आयुष्यच बरबाद केले नाही, तर अमरावतीच्या कठोरा नाका परिसरातील एका भाड्याच्या फ्लॅटला आपल्या पाशवी वासनेचा अड्डा बनवल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. कठोरा रोडवरील 'तो' फ्लॅट आता या प्रकरणाचा मुख्य 'हॉटस्पॉट' ठरला असून, त्याठिकाणी चालणाऱ्या कुकृत्याची भीषणता पाहून तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे. एसआयटीने गुरुवारी कठोरा नाका रोडवरील त्या फ्लॅटमध्ये जाऊन तपास केला असता धक्कादायक बाब म्हणजे, मानव सुगंधे या आरोपीने स्वतःच्या नावाने हा फ्लॅट भाड्याने घेतला होता आणि तो अयान अहमदला पैसे घेऊन तासाप्रमाणे जागा उपलब्ध करून देत होता.

आरोपींची संख्या पोहोचली ८ वर

परतवाडा येथील तरुणींचे लैंगिक शोषण करून त्यांच्या आक्षेपार्ह चित्रफिती सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्यांविरुद्ध ग्रामीण पोलिसांनी आता आक्रमक पाऊले उचलली आहेत. गेल्या २४ तासांत पोलिसांनी आणखी चार संशयितांना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे आतापर्यंत या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची एकूण संख्या आठवर पोहोचली आहे. मात्र, इतकी गंभीर घटना उघडकीस येऊनही सामाजिक भीतीपोटी अजून एकही पीडित युवती किंवा त्यांचे पालक तक्रारीसाठी समोर आलेले नाहीत, हे विशेष.

कॅफेमधील 'केबीन संस्कृती' पुन्हा चव्हाट्यावर

केवळ फ्लॅटच नाही, तर अमरावती शहरातील दोन कॅफेमध्येही या नराधमाने मुलींना नेऊन त्यांच्याशी अश्लील चाळे केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी अयानने परतवाडा, अचलपूर आणि चिखलदऱ्यातून मुलींना फूस लावून अमरावतीत आणले आणि येथे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी गाडगेनगर भागातील एका कॅफेमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रकार उघड झाला होता. अयाननेदेखील शहरातील दोन कॅफेचा अय्याशीसाठी वापर केल्याने त्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

विधानपरिषदेसाठी काँग्रेसनेही पत्ता उघडला!

प्रतिनिधी १७ एप्रिल

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आली आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीच्या अनुषांगाने महाविकास आघाडीकडीतील काही बड्या नेत्यांची नावे चर्चेत आली आहेत. विधान परिषदेसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून उद्धव ठाकरे जाणार की दुसरा उमेदवार देणार? याची चर्चा सुरू असतानाच आता काँग्रेसने देखील हालचाली सुरू केल्याच्या चर्चा आहेत. काँग्रेस पक्षातील काही नेत्यांची नावे देखील विधानपरिषदेसाठी चर्चेत आली हे नेते देखील विधानपरिषदेसाठी इच्छुक असल्याची माहिती आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ जागा येण्याची शक्यता आहे.

आठवड्याच्या शेवटी बाजारात ॲक्शन डे'!

नवी दिल्ली : भारताच्या शेअर बाजारात सध्या कॉर्पोरेट तिमाही निकालांचा हंगाम सुरू आहे. यामध्ये छोटा-मोठ्या कंपन्या दररोज कामगिरी सादर करत असून अलीकडेच एका नामचीन आयटी कंपनीने ४ चे निकाल जारी केले त्यानंतर, शुक्रवार १७ एप्रिल रोजी बाजारात कंपनीचे शेअर्स खरेदी करायला गुंतवणूकदारांची गर्दी जमली आहे.

इराण आणि अमेरिकेत दुसऱ्या फेरीची चर्चा होण्याच्या अपेक्षेमुळे भारतीय शेअर बाजारात गेल्या काही दिवसांपासून सुधारणेचा रंग चढला आहे.

एसटी बसस्थानकांबाबत मोठे निर्णय १ जूनपासून स्वच्छतागृह मोफत

प्रतिनिधी १७ एप्रिल

कोल्हापूर : राज्यातील एसटी प्रवाशांना मोठा दिलासा देणारे महत्त्वाचे निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केले. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी अनेक नवीन घोषणा केल्या. येत्या १ जूनपासून राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांवरील स्वच्छतागृह प्रवाशांसाठी मोफत करण्यात येणार असून, एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल ८ हजार नव्या बसची टप्प्याटप्प्याने भर घालण्याचा निर्णयही घेण्यात आला. याशिवाय, बसस्थानकांवरील कॅन्टीनमध्ये ३० रुपयांत चहा-नाश्ता देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, एसटी महामंडळाच्या ताफ्यात ८ हजार नव्या बसची भर घालण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये सेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. या बस टप्प्याटप्प्याने प्रत्येक जिल्ह्यात पाठविण्यात येणार असून, जुन्या बसांच्या जागी नव्या, सुरक्षित आणि आरामदायी बस उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. दरम्यान, बसस्थानकांवरील कॅन्टीनमध्ये प्रवाशांकडून आकारले जाणारे वाढीव दर लक्षात घेऊन ३० रुपयांत चहा-नाश्ता देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

9 वर्षांपासून रखडलेला न्यु तापडिया नगर उड्डाणपूल निधीचा 54 कोटींचा आकडा फक्त कागदावरच ?

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला: शहरातील न्यु तापडिया नगर येथील रेल्वे ओव्हर ब्रिज प्रकल्प गेल्या ९ वर्षांपासून प्रशासकीय अनास्था आणि निधीच्या घोळामुळे रखडला आहे. ८० टक्के काम पूर्ण होऊनही उर्वरित कामासाठी आवश्यक असलेला ५४ कोटींचा निधी अद्याप उपलब्ध न झाल्याने नागरिकांचे हाल कायम आहेत. या गंभीर विषयावर वंचित बहुजन आघाडीचे गटनेता निलेश देव यांनी आक्रमक पवित्रा घेत प्रशासनाला धारेवर धरले आहे.

मार्च महिन्यात या प्रकल्पासाठी ५४ कोटी निधी मंजूर झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, निलेश देव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मुंबईतील वित्त विभागात केलेल्या पाठपुराव्यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. वित्त विभागाच्या मते, निधीची फाईल अजूनही मंत्र्यांच्या स्तरावर प्रलंबित असून राज्यपालांच्या स्वाक्षरीची प्रतीक्षा आहे. मग 'निधी मंजूर' असल्याच्या बातम्या कोणत्या आधारावर पसरवल्या गेल्या, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

गेल्या दीड वर्षांपासून रेल्वे गेट क्र. ३८ वर नागरिकांना ४४ अंश तापमानात नागरिकांना १५-२० मिनिटे अडकून पडावे लागते. १४ एप्रिल रोजी पंचशील नगरमधील आगीच्या घटनेत अग्निशमन दल आणि रुग्णवाहिकेला याच पुलाअभावी पोहोचण्यास विलंब झाला, ही चिंतेची बाब आहे. या उड्डाणपुलासाठी केवळ आंदोलनेच नाही, तर कायदेशीर लढाही सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन आणि राज्य शासनाने संयुक्त प्रेस नोट काढून निधीची स्थिती, मेगा ब्लॉकची तारीख आणि काम पूर्ण होण्याची अंतिम मुदत जाहीर करावी. अन्यथा, परिसरातील नागरिक तीव्र लोकशाही आंदोलन छेडतील, असा इशारा वंचित गटनेता निलेश देव यांनी दिला आहे.

'जनगणनेचे' निमित्त अन् जनतेचे हाल उत्तर झोनच्या अधिकाऱ्यांची मुजोरी वाढली

महापालिकेचा बोजवारा !

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : शहराचा गाडा हाकण्याची जबाबदारी असलेल्या महापालिका प्रशासनाला सध्या 'जनगणनेचा' ताप चढला आहे. मात्र, या जनगणनेच्या नावाखाली अधिकारी आपल्या मूळ कर्तव्याला हरताळ फासत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. 'जनगणनेचे काम सुरू आहे,' असे पालुपद लावत सामान्य जनतेच्या तक्रारींकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दुसरीकडे शहरात सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांकडे आणि अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले आहे. मोजे नायगाव (सर्वे क्र. २५) येथील एका प्लॉटवर सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार तक्रार करूनही उत्तर झोनचे अधिकारी केवळ टोलवाटोलवी करत असल्याने संताप व्यक्त होत आहे. कुरेशी कॉलनी, अकोट रोड येथील रहिवासी मोम्मद असलम सलीम बक्स कुरेशी यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार केली आहे. त्यांच्या मालकीच्या नायगाव येथील सर्वे क्र. २५ मधील प्लॉटवर शेजारील रहिवासी रमजान शाह यांनी कोणत्याही परवानगीशिवाय आणि मंजूर नकाशाशिवाय बेकायदा बांधकाम सुरू केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हे बांधकाम कुरेशी यांच्या मालकीच्या प्लॉटमध्ये घुसून केले जात असून, सीमारेषांचे दगड आणि खुणा असतानाही हा उघड पणे अतिक्रमण सुरु आहे.

त्या विरोधात तक्रार करुन न्याय मिळत नसेल तर जायचे कोणाकडे असा प्रश्न या महिलेने विचारला आहे. तक्रारदाराने १६ मार्च २०२६ रोजीच यासंदर्भात महापालिकेकडे दाद मागितली होतीमात्र, महिना उलटून गेला तरी उत्तर झोनच्या अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. सध्या जनगणनेचे काम सुरू आहे असे सांगून अधिकारी तक्रारदारांना पिटाळून लावत आहेत. 'जर लोकांच्या हक्काच्या जागेवर होणारी अतिक्रमणे महापालिका थांबवू शकत नसेल, तर हे प्रशासन चालवता कशाला? महापालिका बंद करा!' अशा शब्दांत नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला आहे. नायगाव येथील हे बेकायदा बांधकाम तातडीने न थांबवल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

उत्तर झोनच्या सहाय्यक आयुक्तांची टोलवाटोलवी!

सर्वात वाईट अवस्था उत्तर झोनची झाली आहे. येथील झोन अधिकारी कार्यालयात जागेवर भेटत नाहीत. जर एखादा नागरिक तक्रार घेऊन चुकून भेटलाच, तर त्याला समाधानकारक उत्तर दिले जात नाही. 'हे आमचे काम नाही' किंवा 'सध्या जनगणनेत व्यस्त आहोत' अशी उत्तरे देऊन सर्वसामान्यांची बोळवण केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या या टोलवाटोलवीमुळे त्रस्त झालेल्या जनतेला न्याय मागायचा कोणाकडे, असा प्रश्न पडला आहे.

भेंडवळची ऐतिहासिक घटमांडणी 19 एप्रिलला

पावसाच्या अंदाजाकडे लक्ष! अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर मांडणी; 20 एप्रिलला भाकीत

प्रतिनिधी १७ एप्रिल

जळगाव जामोद: पीक स्थिती, पावसाचे प्रमाण तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींचा अंदाज वर्तविणारी भेंडवळ येथील पारंपरिक घटमांडणी यावर्षी १९ एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर पार पडणार आहे. या मांडणीद्वारे पावसाचे भाकीत काय येणार, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

प्रसिद्ध विदर्भासह राज्यभर असलेल्या या घटमांडणीतून अतिवृष्टी, दुष्काळ, पीकस्थिती, आर्थिक व राजकीय परिस्थिती, तसेच विविध संकटांबाबत अंदाज वर्तविले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांमध्येही या मांडणीबाबत मोठी उत्सुकता असते. यंदाचे भाकीत २० एप्रिल रोजी पहाटे जाहीर करण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील पूर्णा नदीकाठी वसलेल्या भेंडवळ येथे ही परंपरा सुमारे तीनशे वर्षांपासून सुरू आहे. दरवर्षी हजारो शेतकरी प्रत्यक्ष उपस्थित राहून हे भाकीत ऐकतात. आधुनिक तंत्रज्ञान व हवामान खात्याच्या अंदाजांनंतरही या पारंपरिक मांडणीचे महत्त्व कायम आहे. अक्षयतृतीयेच्या दिवशी, म्हणजेच १९ एप्रिल रोजी संध्याकाळी घटमांडणी केली जाणार आहे. त्यानंतर २० एप्रिल रोजी पहाटे चंद्रभान महाराजांचे वंशज पुंजाजी महाराज आणि सारंगधर महाराज यांच्या हस्ते भाकीत जाहीर केले जाईल.

अशी केली जाते घटमांडणी

गावाबाहेरील शेतात घट मांडले जातात. त्यामध्ये गहू, ज्वारी, तूर, उडीद, मूग, हरभरा, जवस, तीळ, बाजरी, तांदूळ आदी अठरा प्रकारचे धान्य ठेवले जाते. मध्यभागी मातीची ढेकळे व त्यावर पाण्याने भरलेली घागर ठेवली जाते. पान-सुपारी व विविध खाद्यपदार्थही ठेवले जातात. रात्रभर कोणीही त्या ठिकाणी थांबत नाही. दुसऱ्या दिवशी झालेल्या बदलांवरून भाकीत वर्तविले जाते.

सुमारे तीनशे वर्षांची परंपरा

भेंडवळ येथील घटमांडणीची परंपरा तीनशे वर्षांहून अधिक जुनी आहे. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या परंपरेतून शेतकरी आगामी हंगामाबाबत मार्गदर्शन घेतात. त्यामुळे या मांडणीला धार्मिक तसेच कृषी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

भक्ती संगीताचे आचार्य संत सूरदास

सूरदास (सुमारे इ.स. १४७८ - सुमारे इ.स. १५६३) हे हिंदीच्या ब्रज बोलीभाषेत लिहिणारे एक भक्तकवी होते. ते त्यांच्या सूरसागर या ग्रंथासाठी प्रसिद्ध आहेत. सूरदासांचा जन्म दिल्लीजवळच्या सीही गावात एका सारस्वत ब्राम्हण कुटूंबात झाला. त्यांचे आयुष्य आग्र्याजवळच्या गऊघाट व मथुरेजवळच्या गोवर्धन या गावांत गेले. वल्लभाचार्यांनी त्यांना श्रीकृष्णभक्तीचा उपदेश दिला. सूरसागर या ग्रंथात श्रीकृष्णाच्या जीवनाचे वर्णन आहे.



त्यातील काव्य व गानसौंदर्यामुळे ते तत्कालीन समाजात प्रसिद्ध झाले. सूरदासांची प्रसिद्धी ऐकून तानसेनाच्या मध्यस्थीने अकबर बादशहा त्यांना भेटायला आला. तेव्हा अकबराच्या सांगण्यावरून सूरदासांनी त्याची स्तुतीकवने लिहीण्यास नकार दिला, अशी आख्यायिका आहे.

या प्रसंगानंतरही अकबराने सूरसागराचा फारसी अनुवाद करवला. सूरसागरातील भ्रमरगीत हा भाग साहित्यिक दृष्टीने विशेष महत्त्वाचा मानला जातो. या ग्रंथाने हिंदी भाषेचे सौंदर्य वाढवले असे म्हणले जाते. आधुनिक काळात सूरसागराचे प्रकाशन वाराणसीच्या नागरी प्रचारिणी सभेने १९५० मध्ये केले. २०१५ मध्ये सूरसागराचे इंग्लिश भाषांतर हार्वर्ड विद्यापीठाने प्रकाशित केले.

सूरसागराशिवाय सूरदासांनी सूरसारावली, साहित्यलहरी, नलदमयन्ती अशा इतर ग्रंथांचेही लिखाण केले.

सूरदास यांचा जन्म इ.स. १५४० मध्ये रुणकटा नावाच्या गावात झाला. हे गाव मथुरा-आग्रा मार्गालगत वसलेले आहे. काही विद्वानांचा असा विश्वास आहे की सूरचा जन्म सिही नावाच्या खेड्यातल्या एका गरीब सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला होता. तो खूप विद्वान होता, त्याच्या लोकांची आजही चर्चा आहे. सूरदास यांचे वडील रामदास गायक होते. सूरदासच्या जन्माबद्दल मतभेद आहेत. सुरुवातीला सुरदास आग्राजवळील गौघाट येथे राहत होता. तेथे असताना त्यांनी श्री वल्लभाचार्य यांची भेट घेतली आणि त्यांचे शिष्य झाले. वल्लभाचार्य यांनी पुष्तीमार्गामध्ये त्यांची दीक्षा घेतली आणि कृष्णालीला पद गाण्याचे आदेश दिले. १५८० मध्ये गोवर्धन जवळच्या परसौली गावात सूरदास यांचा मृत्यू झाला.

सूरदास यांची जन्म तारीख व जन्म स्थान याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. 'साहित्य लाहिरी' ही सूर यांनी लिहिलेली एक रचना मानली जाते. यामध्ये साहित्य लाहिरीच्या निर्मिती आणि कालावधीच्या संदर्भात खालील स्थान आढळले आहे.

कृष्णभक्तिपर पदे रचणाऱ्या आठ भक्तकवींच्या अष्टछाप कवि संप्रदायामध्ये सूरदास अग्रगण्य मानले जातात. कृष्णभक्तीचा प्रवाह जनताभिमुख करण्यात सूरदासाच्या पदांचा वाटा मोठा आहे. त्याच्या भक्तिकाव्यातून पुष्टिमार्गी संप्रदायाची तत्त्वे प्रभावीपणे व सोप्या पद्धतीने मांडली आहेत. श्रीकृष्ण हा सर्वश्रेष्ठ परमेश्वर असून त्याची भक्ती व अनुग्रह (पुष्टी) हाच मानवाच्या अंतिम कल्याणाचा श्रेष्ठतम मार्ग, हे या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सूरदासाने सोप्या गेय पदांतून मांडले. गोस्वामी विठ्ठलनाथांनी सूरदासाचा 'पुष्टिमार्गाचे जहाज' या शब्दांत गौरव केला. सूरसागर मध्ये काव्य व संगीत यांचा उत्तम मिलाफ साधला आहे. त्याने ब्रज भाषेत पदे रचली. पदांची भाषा सहजसोपी व नादमधुर असून प्रसंगचित्रे प्रत्ययकारी आहेत. सूरदासाला हिंदी साहित्यातील 'सूर' (सूर्य) म्हणून संबोधिले जाते.

इयत्ता आठवीच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळणे निषेधार्यच !

अखिल भारतीय मराठा महासंघ

अकोला : इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्यामुळे मराठा समाजात संतप्त प्रक्रिया उमटत आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे आणि केंद्रीय कार्यकारिणीचे आदेशान्वये राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातून तो नकाशा इतिहासाच्या पुस्तकात पूर्ववत समाविष्ट करून राजपुताना प्रदेश मराठा प्रभाव क्षेत्रात दाखवावा अशी मागणी होत आहे.

त्याच अनुषंगाने आज अखिल भारतीय मराठा महासंघ शाखा अकोलाचे वतीने माननीय जिल्हाधिकारी यांना सविस्तर मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पूर्वी समाविष्ट असलेला मराठा समाजाचा नकाशा अलीकडील आवृत्यामध्ये वगळण्यात आलेला आहे. हा नकाशा पुन्हा समाविष्ट करून त्यामध्ये राजपुताना (राजस्थान) हा मराठा साम्राज्याचा प्रभाव क्षेत्रात दाखवावा. या संदर्भात ऐतिहासिक पुरावे सुध्दा निदर्शनास आणून दिले आहेत.

हे आहेत ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ पुरावे

१)मराठा-मारवाड संबंध(१७२४-१८४३) या ग्रंथांमध्ये राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी जयपुर यांनी प्रकाशित केलेल्या दस्तऐवजांमध्ये मराठा आणि राजपूत राज्यांमधील संबंध स्पष्टपणे नोंदलेले आहे. या पत्रांमध्ये मराठा सरदारांकडे मदत संरक्षण व सैन्य पाठवण्याच्या विनंत्या करण्यात आल्याचे स्पष्ट दिसते.

२)संबंधित पत्रव्यवहारामध्ये विविध राजपूत शासकांनी मराठा सरदारांना (उदा. विसाजी पंत बिनीवाले) थेट विनंती करून सैन्य मदत मागितल्याचे उल्लेख आहे. यावरून त्या प्रदेशावर मराठ्यांचा प्रभाव व राजकीय वर्चस्व होते,हे सिद्ध होते.

३)१७५२ च्या करारानंतर मुघल बादशहा मराठ्यांच्या संरक्षणाखाली गेला होता. परिणामी मुघलांचे मंडलिक असलेले अनेक राजपूत शासन अप्रत्यक्षपणे मराठा सत्तेखाली आले होते, असा इतिहासकारांचा सर्वमान्य निष्कर्ष आहे.

४)विविध ऐतिहासिक कागदपत्रानुसार मराठ्यांनी राजस्थानातील प्रदेशातून चौथाई व सरदेशमुखी वसूल केली. ही बाब त्यांच्या प्रभावी राजकीय अधिकाराचे द्योतक आहे.

हया सर्व बाबी लक्षात घेता मराठा समाजाचा नकाशा हा केवळ भौगोलिक सीमांचा नसून प्रभावक्षेत्र दर्शविणारा आहे. त्यामुळे राजपुताना प्रदेश मराठा प्रभाव क्षेत्रात दाखवणे हे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य व आवश्यक आहे. म्हणून - मराठा साम्राज्याच्या नकाशा पुन्हा पाठ्य पुस्तकात समाविष्ट करावा, संबंधित नकाशामध्ये राजपुताना प्रदेश मराठा प्रभाव क्षेत्र म्हणून दाखवावा.

या संदर्भात इतिहास तज्ञांची समिती नेमून योग्य शास्त्रीय पडताळणी करून निर्णय घ्यावा. शासनाने निवेदनाचा सकारात्मक विचार करून विद्यार्थ्यांना वस्तुनिष्ठ व पुराव्याधारित इतिहास उपलब्ध करून द्या असे अकोला जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सदर निवेदनावर राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे,विभागीय महिला अध्यक्ष कल्पनाताई बिडवे, जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, सिंधुताई पवार, राजेश पाटील,राखी पटेकर, मीना लांडे,योगेश थोरात अरुण खोटरे, विठ्ठलराव वाघ, माधुरी वाघमारे, श्रीकांत सरोदे, प्रदीप लुगडे , शंतनू वस्तू,विपुल माने, शाम देशमुख,अजिंक काळे, रोहित बारस्कर, नितीन पाटील,अंकीत कदम, विक्रांत वाघमारे, नरेश सूर्यवंशी उमेश साबळे, अंकुश मोटे, संतोष वक्ते, प्रवीण शिंदे, दीपक गावंडे, दीपक सरोदे ,शिवाजी होनाळे, उमेश गायगोळे, प्रवीण कदम आदींच्या सह्या असल्याचे जिल्हा सोशल मीडिया प्रमुख सचिन पाटील गोमासे यांनी कळविले आहे.

चाळीशी नंतर झोपेची समस्या

चाळीशी नंतर झोपेची समस्या किंवा निद्रानाश हे गंभीर आरोग्याचे लक्षण असू शकते. या वयानंतर शरीराची झोपेची गुणवत्ता कमी होते, ज्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नाही. या स्थितीला 'सायलेंट किलर' संबोधले जाते, कारण त्याचा थेट परिणाम व्यक्तीच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होतो, परंतु अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

वाढत्या वयाबरोबर झोपेची आवश्यकता बदलते, परंतु असे असूनही ७-८ तासांची झोप आवश्यक आहे. निद्रानाशाच्या समस्येमुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, मधुमेह यांसारखे आजार होऊ शकतात. याशिवाय मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिडेपणा, लक्ष न लागणे, नैराश्य यासारखी लक्षणे देखील दिसू शकतात. चाळीशी नंतर शरीरात मेलाटोनिन नावाच्या हार्मोनची पातळी कमी होते, ज्यामुळे झोपेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. यामुळे निद्रानाशाच्या समस्येला सामोरे जावे लागते. या वयात झोपेची कमतरता गंभीर आजारांचा धोका वाढवते, ज्यामुळे जीव धोक्यात येऊ शकतो.

मानसिक आरोग्य समस्या : नैराश्य, चिंता आणि पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर यासारख्या इतर मानसिक आरोग्य समस्या झोपेत अडथळा आणू शकतात.

वैद्यकीय परिस्थिती : निद्रानाशाशी संबंधित सामान्य वैद्यकीय स्थितीत कर्करोग, तीव्र वेदना, हृदयरोग, मधुमेह, दमा, अतिक्रियाशील थायरॉईड, अल्झायमर रोग, जीईआरडी, गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स रोग आणि पार्किन्सन रोग यांचा समावेश होतो.

औषधे : विविध प्रिस्क्रिप्शन औषधे देखील नैसर्गिक झोपेच्या चक्रात व्यत्यय आणू शकतात. यात रक्तदाब किंवा दम्याची औषधे, डिप्रेसस प्रतिबंधक औषधांचा समावेश होतो. वेदना, अलर्जी आणि सर्दी यासाठी काउंटरवर न मिळणारी अनेक औषधे आणि वजन कमी करणारी उत्पादने देखील त्यांच्या कॅफीन सामग्रीमुळे तंद्री आणू शकतात.

अल्कोहोल, निकोटीन आणि कॅफिन : कोला, चहा, कॉफी, इतर कॅफिनयुक्त पेये ही उत्तेजक आहेत जी संध्याकाळी किंवा दुपारी घेतल्यास झोपेत व्यत्यय आणू शकतात. तंबाखू मध्ये निकोटीन असते जे एक उत्तेजक देखील आहे, जे झोपेत व्यत्यय आणू शकते. अल्कोहोल झोपेला प्रवृत्त करते, परंतु गाढ झोपेचे टप्पे प्रतिबंधित करते आणि मध्यरात्री जागरण करते.

झोपेशी संबंधित परिस्थिती : रेस्टलेस लेग सिंड्रोम आणि सतत पाय हलवण्याच्या सवयीमुळे पायात अस्वस्थता जाणवू शकते, ज्यामुळे योग्य झोप येत नाही. स्लीप एप्निया ही आणखी एक स्थिती आहे, ज्यामुळे रात्रभर वेळोवेळी श्वास घ्यायला त्रास होतो. ज्यामुळे झोपेत व्यत्यय येतो.

स्क्रीन टाईममुळे झोपेची समस्या: सध्या टिव्ही, मोबाईल, कॉम्प्युटर हा पाहण्याचा कालावधी वाढला आहे. त्यामुळे सर्वच वयोगटात झोपेची समस्या गंभीर बनत असल्याची दिसून येत आहे. यावर आपला स्क्रीन टाईम कमी करणे हाच एक उपाय आहे.

संकलन :
मिलिंद पंडित, कल्याण

दिन विशेष

आज जागतिक हिमोफिलिया दिन

जागतिक हिमोफिलिया दिन दरवर्षी १७ एप्रिल रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश या आनुवंशिक रक्तस्त्राव विकाराबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि रुग्णांना उत्तम उपचार मिळवून देणे हा आहे. हा एक दुर्मिळ आजार आहे, ज्यामध्ये रक्ताच्या गुठळ्या (Clotting) नीट न झाल्यामुळे, किरकोळ दुखापतीनंतरही रक्तस्त्राव थांबत नाही.

जागतिक हिमोफिलिया दिनाबद्दल महत्त्वाचे तपशील:

इतिहास : जागतिक हिमोफिलिया महासंघाचे (WFH) संस्थापक फ्रँक श्नेबेल यांचा जन्मदिवस म्हणून १९८९ पासून हा दिवस पाळला जातो.

प्रकार: मुख्यत्वे दोन प्रकार आहेत: हिमोफिलिया ए (फॅक्टर ८ ची कमतरता) आणि हिमोफिलिया बी (फॅक्टर ९ ची कमतरता).

लक्षणे : जखमेतून जास्त रक्त वाहणे, सांध्यांमध्ये वेदनादायक सूज, त्वचेखाली मोठे निळे डाग पडणे, आणि अंतर्गत रक्तस्त्राव. हा आजार आनुवंशिक आहे, जो मुख्यतः गुणसूत्रातील दोषामुळे पुरुषांमध्ये आढळतो, तर स्त्रिया सहसा याच्या वाहक असतात. रक्तातील क्लॉटिंग फॅक्टरची कमतरता भरून काढण्यासाठी 'रिप्लेसमेंट थेरपी' हा मुख्य उपचार आहे. या दिवशी जगभरातील प्रमुख इमारतींवर लाल रंगाची रोषणाई करून हिमोफिलियाबद्दल जनजागृती केली जाते. १९०४ मध्ये रशियात या आजाराचे रूग्ण आढळले होते. त्या नंतर त्याला पायबंद घालण्यासाठी उपाय योजना करण्यात येऊ लागल्या.

नारी शक्ती : मूलभूत सन्मानापासून स्वत : चे अवकाश !

'स्त्रियांना फक्त गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले; आता त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणून पाहण्याची गरज आहे, असे अत्यंत महत्त्वपूर्ण विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

भारतातील एखाद्या गावातील तिशीतली स्त्री डोळ्यासमोर आणा. काही वर्षांपूर्वी ती पहाटे अंधारात, भीतीच्या छायेत घराबाहेर जाऊन नैसर्गिक विधी आटोपत असे. घरातील सर्वांसाठी पाणी दूरवरून आणणे, लाकडाच्या धुरात स्वयंपाक करणे, स्वतःच्या नावावर घर नसणे, बँक खाते नसणे, अशा अनेक मर्यादांमध्ये तिचे आयुष्य अडकलेले होते. पण आज ही परिस्थिती बदलली आहे. या परिवर्तनाला नाव आहे 'नारी शक्ती'. गेल्या काही वर्षांत महिलांच्या जीवनातील प्रत्येक पैलू एकमेकांशी जोडून बदल घडविण्याचा प्रयत्न झाला आहे.

महिलांच्या सन्मानाची सुरुवात मूलभूत गरजांपासून झाली. स्वच्छ भारत अभियानातून कोट्यवधी शौचालयांची निर्मिती झाली आणि ग्रामीण भारत खुले शौचालयमुक्त झाला. यामुळे महिलांची सुरक्षितता वाढली. जल जीवन मिशनमुळे घराघरात नळजोडणी झाली आणि पाण्यासाठी होणारी दररोजची कसरत कमी झाली. उज्ज्वला योजनेतून महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळाले, धुरामुळे होणारे आरोग्याचे त्रास कमी झाले. प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावावर घरे देण्यात आली, ज्यामुळे त्यांना मालकी हक्क आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली. शौचालय, पाणी, इंधन आणि घर, हे केवळ योजना नसून सन्मान पुनर्स्थापित करण्याचा एकत्रित प्रयत्न आहे. महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात जन्मापूर्वीपासूनच होते. पोषण अभियान बालकांच्या पहिल्या १००० दिवसांवर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून मातांना थेट आर्थिक मदत मिळते. सुरक्षित मातृत्व आश्वासन 'सुमन' योजना राबविण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि जीवन ज्योती विमा योजना यामुळे महिलांना आर्थिक संरक्षण मिळाले. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'मुळे मुलींच्या जन्मदरात सुधारणा झाली, तर 'सुकन्या समृद्धी' योजनेमुळे मुलींचे भविष्य सुरक्षित झाले.

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा कणा आहे. जनधन योजनेमुळे कोट्यवधी महिलांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. मुद्रा योजनेत महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाले. स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले. 'लखपती दीदी' ही संकल्पना ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. 'नमो ड्रोन दीदी'सारख्या उपक्रमातून महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'मिशन शक्ती' अंतर्गत सखी वन-स्टॉप केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, जिथे कायदेशीर, वैद्यकीय आणि समुपदेशन सेवा एकाच ठिकाणी मिळतात. महिला हेल्पलाईन, निर्भया निधी आणि इतर उपक्रमांनी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. तात्काळ तीन तलाक बंदी हा महिलांच्या अधिकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. आज भारत 'कल्याणकारी' दृष्टीकोनातून 'महिला-नेतृत्वाखालील विकास' या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात प्रत्येक महिलेला सोबत घेणे हीच खरी प्रगती ठरेल. 'नारी शक्ती पुढे चालली आहे; आता देशाने कोणतीही महिला मागे राहू देऊ नये.'

महिलांचा अवकाश

आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत. अवकाश संशोधनापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत त्यांनी आपली छाप पाडली आहे. महिला आता केवळ सहभागी नाहीत, तर नेतृत्वही करत आहेत. STEM क्षेत्रातही महिलांची संख्या वाढत आहे.

संवैधानिक टप्पा

'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा ऐतिहासिक निर्णय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पंचायती राज व्यवस्थेतही जवळपास अर्ध्या प्रतिनिधी महिला आहेत. महिलांचे नेतृत्व वाढल्यास समाजातील विकास अधिक सर्वसमावेशक होतो, हे सिद्ध झाले आहे.

३६० अंशांचा दृष्टिकोन

शौचालय, पाणी, इंधन, घर, आरोग्य, रोजगार, सुरक्षा आणि प्रतिनिधित्व, हे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. यापैकी एक जरी तुटला, तरी सक्षमीकरणाची साखळी अपूर्ण राहते. म्हणूनच हा ३६० अंशांचा दृष्टिकोन आहे. महिलांच्या संपूर्ण जीवनाचा विचार करणारा.

आर. विमला (भा. प्र. से.) सचिव तथा
निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन,
नवी दिल्ली

साहित्यिक, लेखकांना आवाहन

दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tender Notice

Super scribed tender offers are invited on line from registered contractor/companies for S/Dn. wise e-tender No.-**1)EE/ AKL/ U/T/PM- DTC-USD-I /T-01 (2026-27), 2)EE/AKL/ U/T/ PM-HT-USD-I /T-02 (2026-27),3) EE/AKL/U/T/ PM-LT-USD-I/T-03 (2026-27), 4)EE/AKL/U/T/ PM- DTC-USD-II /T-04 (2026-27), 5)EE/AKL/U/T/ PM-HT-USD-II/T-05 (2026-27), 6)EE/AKL/U/T/ PM-LT-USD-II/T-06 (2026-27),7)EE/AKL/U/T/ PM- DTC-USD-III/T-07(2026-27), 8)EE/AKL/U/T/ PM-HT-USD-III /T-08 (2026-27) and 9)EE/AKL/U/T/ PM-LT-USD-III /T-09 (2026-27) for Non-Empanelment of Agency for *Preventive Maintenance of Distribution Transformer center, HT line &UG Cable and LT line & UG Cable for FY 2026-27 in Urban Sub Division- I,II & III under Urban Division Akola of Akola Circle.*** The details of tender are available on our official web site at http://etender.mahadiscom.in/eatApp/ & can be downloaded from **Dtd.16.04.2026 onwards.** Submit the tender through e-tendering process only latest by **Dtd. 27.04.2026 up to 15.00 Hrs.** For further details refer our website. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc, if any, shall be available in our website only & will not be published in the newspapers separately.
PRO NO.- 51Date: 16.04.2026
Executive Engineer, Urban Division M.S.E.D.C.L.,Akola

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

हवामान खात्याचा विदर्भासाठी यलो अलर्ट जारी

अकोला: अकोला शहरात उष्णतेची तीव्र लाट कायम असून बुधवारी तापमान ४४.२ अंश सेल्सियसवर पोहोचले. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. हवामान विभागाने विदर्भासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी तातडीची बैठक घेत आरोग्य यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिले. तर अकोल्यातील शाळा आता ११ वाजेपर्यंतच राहतील. जिल्हा सर्वोपचार रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एकूण १३७ खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. उष्माघात कक्षही सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे. तर दुसरीकडे भरपूर पाणी प्यावे आणि लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व गर्भवती महिलांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. आर आर सी न्यूजने शाळा व महाविद्यालय आणि कोचिंग क्लासेस च्या मनमानी वेळेत सुरु असल्याबद्दल वृत्त प्रसारीत करताच आज शिक्षण विभागाने ११ वाजेपर्यंच शाळा सुरु ठेवण्याचे आदेश दिले आहे. कोचिंग क्लासेने देखील या विषयी सकारात्मक निर्णय घेण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेचा 'धडक' ऑन द स्पॉट रिपोर्ट

◆ ११ वाजल्यानंतर शाळा भरल्यास होणार कडक कारवाई

प्रतिनिधी १७ एप्रिल

- शाळा सकाळी ११ वाजता सुटल्या की नाही याची पाहणी
- शाळा, कोचिंग क्लासेस, महाविद्यालयांच्या सुविधांचा घेतला आढावा
- महापालिकेचे पथक जिल्हाधिकाऱ्यांना देणार या विषयीचा अहवाल
- लहान मुले, कोचिंग क्लासेस दूपारी उन्हात न घेण्याच्या आदेशाची अमलबजावणी
- शाळा व कोचिंग क्लासेसच्या विविध व्यवस्थापनाची उडाली धावपळ
- सायंकाळी ५ पर्यंत सुरु राहणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कारवाई केव्हा
- उन्हात सुरु ठेवणाऱ्या कोचिंग क्लासेसला दंड आकारणे आवश्यक

अकोला : राज्यामध्ये उन्हाचा तडाखा वाढत असतानाच, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महानगरपालिका प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शहरात सकाळी ११ वाजल्यानंतरही काही शाळा आणि कोचिंग क्लासेस सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर, महापालिकेच्या विशेष पथकाने आज विविध भागांत अचानक तपासणी मोहीम राबवली.

महानगरपालिकेच्या पथकाने सकाळी ११ वाजेच्या सुमारास शहरातील विविध शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसना भेटी दिल्या. शासनाच्या आदेशानुसार शाळा सकाळी ११ वाजेपर्यंतच भरवणे बंधनकारक आहे. मात्र, काही ठिकाणी या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले. पथकाने केवळ वेळेचीच पाहणी केली नाही, तर पिण्याचे पाणी, वर्गातील खेळती हवा आणि विद्यार्थ्यांसाठी असलेल्या इतर सुविधांचाही सविस्तर आढावा घेतला.

कोचिंग क्लासेसवर कारवाईची टांगती तलवार

शाळांनी वेळेचे पालन केले असले, तरी अनेक कोचिंग क्लासेस दुपारी उन्हाच्या तडाख्यात आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उन्हात क्लासेस सुरू ठेवणाऱ्या या संस्थांवर महापालिका कधी कारवाई करणार, असा प्रश्न आता पालक विचारत आहेत. नियम मोडणाऱ्या क्लासेसना प्रशासनाने मोठा दंड आकारावा, अशी मागणी जोर धरत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग क्लासेसवर लवकरच दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता आहे. पथकाने केलेल्या या पाहणीचा सविस्तर अहवाल आजच जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला जाणार आहे.

शासनाच्या आदेशाचे पालन करा, अन्यथा....

महापालिकेचे पथक अचानक दारात उभे राहिल्याने अनेक शाळा आणि क्लासेसच्या संचालकांची चांगलीच धावपळ उडाली. 'लहान मुलांचे आरोग्य आमची प्राथमिकता आहे. दुपारच्या कडक उन्हात विद्यार्थ्यांना वर्गात बसवणे धोकादायक आहे. जे कोचिंग क्लासेस आदेशाचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. अशी माहिती उपायुक्त विजय पारतवार यांनी दिली.

भारताची जनगणना दोन टप्प्यात संपन्न होणार

जनगणनेत पहिल्यांदाच स्वगणनेची सुविधा

अकोला: भारताची १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना सुरू झाली आहे. राज्यात १ मे ते १५ मे या कालावधीत डिजिटल जनगणना आणि स्वगणना या माध्यमातून ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. यामध्ये तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे. राज्यात ही जनगणना १ मे ते १५ मे आणि १६ मे ते १५ जून अशा दोन टप्प्यात पार पडेल. ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल असेल आणि पहिल्यांदाच नागरिकांना 'स्वगणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिक पोर्टलच्या माध्यमातून आपल्या आधार कार्ड किंवा मोबाईल क्रमांकाचा वापर करून स्वतःची माहिती स्वतः भरू शकतात. यामुळे तरुण वर्ग या कार्यात उत्साहाने सहभागी होऊ शकतो. ज्या नागरिकांना मोबाईल वापरता येत नाही, अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी बीएलओ घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. 'सर्व नागरिकांनी जनगणनेसाठी आपली अचूक माहिती द्यावी. तुमची सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय राखली जाईल. ही प्रक्रिया अत्यंत सोपी, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारी असल्याने नागरिकांनी 'स्वगणना' पद्धतीचा अवलंब करावा.'

ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

१ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त

अकोला: अकोट ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत अवैध दारू व्यवसायाविरोधात मोठी कारवाई केली आहे. विविध ठिकाणी छापेमारी करत पोलिसांनी तब्बल १ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी ५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१५ एप्रिल रोजी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी विविध गावांमध्ये छापेमारी केली. या कारवाईत पोपटखेड शेतशिवार येथे सुरू असलेल्या हातभट्टीवर धाड टाकून ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महागाव येथून १० हजार २०० रुपये, वडाळी देशमुख येथून ४ हजार ३०० रुपये, लोहारी येथून २ हजार १०० रुपये आणि उमरा येथून ५ हजार २५० रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी पाच आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

अक्षय तृतीयेसाठी बाजार सजला!

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : अक्षय तृतीया हा हिंदू धर्मातील एक सण आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस सनातन धर्मात अत्यंत शुभ मानला जातो. अक्षय तृतीयेचा दिवस वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला साजरा केला जातो. या दिवशी केलेले कोणतेही शुभकार्य अक्षय म्हणजेच अविनाशी मानले जाते. तसेच या दिवशी सोने-चांदी खरेदी करण्याची परंपरा आहे. त्यामुळे अक्षय तृतीयेसाठी बाजारही सजला आहे. तसेच या दिवशी आपल्या पूर्वजांना घ्यास घालण्याची प्रथा असल्याने त्यासाठी बाजारात कवला-कचुला, मडकी, वाळा यांची दुकाने सजली आहेत.

यादिवशी काही वस्तू खरेदी करणे अत्यंत भरभराटीचे लक्षण मानले जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा केल्याने त्यांची कृपा यादिवशी मिळते आणि घरात सुखशांती येते समृद्धी मिळते असे मानतात. धार्मिक पौराणिक कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना अक्षय पात्र भेट दिले होते. यामुळे त्यांना आपल्या प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. अक्षयतृतीयेला सोने आणि चांदी घेणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच यादिवशी वास्तू खरेदी करणे सुद्धा शुभ मानतात. गृहप्रवेश केला जातो, वास्तुशांती देखील घातली जाते. नवीन गाडी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनेकजण घेतात.

◆ खरेदीचा मुहूर्त साधण्यासाठी प्रयत्न

पूजा विधी

अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा करण्याची मान्यता आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. असे म्हणतात यादिवशी देवीची पूजा केल्याने तिची कृपा प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. दिवाबत्ती, धूप हार फुले वाहून देवीची आराधना करावी. काहीजण कलश मांडून देखील पूजा करतात. तसेच घरात गोडाचा नैवेद्य करून तो देवाला अर्पण करावा.

वडाळी देशमुख नगरीत पंच अवताराच्या नामाचा गजर

◆ पालखी सोहळा संपन्न, हजारो भाविकांनी महाप्रसाद लाभ

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोट: वडाळी देशमुख येथील दत्त प्रभू यात्रा महोत्सव चैत्र शुद्ध षष्ठीला तीर्थस्थापना व गावातून पालखी सोहळा व भव्य मिरवणूक आयोजन करण्यात आले होते, दत्तप्रभू मंदिर पांढरी संस्थान बोर्डी नदीच्या किनाऱ्यावर झाडांच्या दाटीमध्ये वसलेले ऐतिहासिक पुरातन एकांत वास रमनीय थंड हवेचे स्थळ तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते याच ठिकाणी भाविक अभिमान स्थान भाविक सव्वा महिना दुःख निवारणे मनोरथ सिद्धी पुरातन मंदिर अशी आख्यायिका अनेक चमत्कारी महानुभाव भक्तांना आले आहे असे भाविक कडून बोलल्या जात आहे,

गावामधून श्रीधर दशरथ हाडोळे यांच्या हातून तीर्थ स्थापना दत्तप्रभू स्थान विडा उटी उपहार अवसर आरती पालखी फुल पुष्प विशेष विद्युत रोषणाईने सजवण्यात आली पालखीमध्ये विशेष देवाच्या पदस्पर्श विशेष ठेवून मुख्य रोडवर साफसफाई पाण्याचा सडा व ठीक ठिकाणी दिवे रांगोळ्या सहित हिम्मत मुळे यांच्या घरासमोरील श्री चक्रधर स्वामी मंदिरावर पूजा व आरती होऊन प्रसाद घेऊन सर्व भाविकांना थंड पाणी नींबू शरबत देण्यात आले गावामध्ये चौका चौका मध्ये आरत्या घेऊन पालखीचे पूजन केल्या गेले गावांमधून ढोल नगारे टाळ झांज व ढाफळे च्या गोविंद प्रभू की जय, श्री दत्तप्रभू की जय हो या गजरात पंच अवताराच्या नगरी नामाचा नगरीमध्ये गजर गाजू लागला होता भाविक नाचत गायन करत आरत्या व महिलांच्या डफळ्यांच्या तालावर फुगड्यांचा नाचण्याचा विशेष मनमुराद आनंद भाविकांनी पालखी सोहळा मिरवणुकीमध्ये घेतला, व दत्त मंदिर पांढरी संस्थांवर दुसऱ्या दिवशी कळस स्थापना विद्यापन कळस हालविले निर्गुण मुनी भोजने यांच्या आश्रमातील भिक्षुक मंडळी त्यांच्या हस्ते प्रवचनाचा कार्यक्रम प्रभाकर दादा महानुभाव काकडा आश्रम यांचे प्रवचन झाले. आरती उपहार व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला.

नाईक होमिओपॅथी क्लिनिक मध्ये आज मोफत आरोग्य शिबिर

◆ ऑटोचालकांना उष्माघाताचे औषध वितरण

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : नाईक होमिओपॅथी क्लिनिक मध्ये १५ एप्रिल रोजी आयोजित मोफत आरोग्य शिबिरात रूग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि त्यांच्या विनंतीला मान देवून आरोग्य शिबिर शुक्रवार, १७ एप्रिल रोजी आयोजिले आहे. ज्या रूग्णांना १५ एप्रिल रोजी शक्य झाले नाही त्यांनी आज निशुल्क आरोग्य शिबिराचा फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच आधी दिलेल्या प्रतिसादासाठी आर आर सी न्यूज चॅनेलच्या दर्शकांचे आभार मानले.

दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानामुळे शहरात फिरणे घातक ठरले आहे. शहरात उष्माघातामुळे पहिला मृत्यु झाला. या बाबीची गंभीर दखल घेवून नाईक होमिओपॅथी तर्फे शहरात सर्व ऑटोचालकांकरिता उष्माघाताचे औषध नि:शुल्क वितरण करण्यांचे ठरविले आहे. शहरातील सर्व ऑटोधारकांनी नाईक होमिओपॅथी मध्ये येवून उष्माघाताचे औषध घेवून जावे. असे आवाहन नाईक होमिओपॅथी तर्फे करण्यांत आले आहे.

१७ एप्रिल रोजी आयोजित मोफत आरोग्य शिबिरात थॉयरॉईड, लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, पोटदुखी, संधीवात, मायग्रेन, अस्थमा, पिसीओडी, सोरायसीस, वंध्यत्व, केस गळणे, लैंगिक समस्या यासारख्यां आजारांवर तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभले. रूग्णांना त्याचा लाभ झाला असा दावा नाईक होमिओपॅथी क्लिनिकच्या वतीने करण्यात आले आहे. विना शस्त्रक्रिया विना दुष्परिणाम आजार अनेक, उपचार एक अशा तत्वावर विश्वास ठेवून नाईक होमिओपॅथी क्लिनिकच्या माध्यमातून गेल्या ४० वर्षापासून आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जात आहे. शुक्रवार, १७ एप्रिल रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत नाईक होमिओपॅथी क्लिनिक, एन.सी.सी. ऑफीस जवळ, आळशी प्लॉट, अकोला येथे मोफत आरोग्य शिबीर आहे. संबंधित रुग्णांनी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

अकोटमध्ये वंचितच्या नगरसेविकेच्या पतीवर प्राणघातक हल्ला; जुन्या राजकीय वादाची चर्चा

वि. प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोट : शहरातील इंदिरानगर परिसरात वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेविकेचे पती इमरान खान व त्यांच्या पुतण्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हा हल्ला जुन्या राजकीय वादातून झाल्याची चर्चा प्रभात ९ परिसरातील नागरिकांमध्ये सुरू आहे. इम्रान खान यांच्या पत्नी नगरसेविकेने सांगितले की, प्रभाग क्रमांक ९ मध्ये १४ एप्रिल रोजी झालेल्या कार्यक्रमात व मिरवणुकीमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतल्यामुळे हा हल्ला करण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या हल्ल्यात इमरान खान व त्यांच्या पुतण्याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, हल्ल्यामागील नेमके कारण काय याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नसून पोलिस तपासानंतरच सत्य स्पष्ट होणार आहे.

नेत्यांची गुलामगिरी नको म्हणून शिवसेना जिल्हा प्रमुखाचा राजीनामा

◆ शिवसेना जिल्हा प्रमुख अश्विन नवले यांचे राजीनामा पत्र झाले व्हायरल

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला: अकोला जिल्ह्याच्या राजकारणात आज मोठी खळबळ उडाली आहे. एका बाजूला शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे, तर दुसऱ्या बाजूला महापालिकेतील राडा प्रकरणी शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या दोन मोठ्या घटनांमुळे महायुतीमधील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आला आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांचे राजीनामा पत्र आज सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रात नवलेंनी स्थानिक नेतृत्वावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. अकोल्यातील एका बड्या नेत्याला त्यांनी 'विचारहीन आणि स्वार्थी' ठरवले आहे. 'आम्ही पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले, पण अशा स्वार्थी वृत्तीच्या व्यक्तीसोबत काम करणे आता शक्य नाही. आम्ही कोणाचे गुलाम म्हणून राहू शकत नाही,' असे नवलेंनी पत्रात नमूद केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अकोल्यातील आणखी एक जिल्हाप्रमुख राजीनामा देण्याच्या तयारीत असून, यामुळे जिल्ह्यात शिवसेनेला मोठे खिंडार पडण्याची शक्यता आहे. अश्विन नवले इतर कुठल्या पक्षात जातील काय याची चर्चा आता सुरु झाली आहे.

आ. रणधीर सावरकर यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

प्रतिनिधी १७ एप्रिल

कुटासा: आ. रणधीरभाऊ सावरकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ग्रामीण भागात येणाऱ्या ग्राम रेल, धारेल, गिरजापुर, पातोडा जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी येणाऱ्या साहित्याचे वाटप करण्यात आले यामध्ये रजिस्टर पेन पेन्सिल याचा समावेश होता. यावेळी जिल्हा सचिव भाजपा दादाराव पेटे विनोद पाटील मगळे सरपंच धारेल ,मोहन कपले, बाबुशिंग सोळंके ग्रां. प सदस्य , शारदा सांगोरकर शाळेतील विद्यार्थी शिक्षक शिक्षिका यांची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

'मी यथेच्छ विष प्यायले' म्हणत महीलेची आत्महत्या

भाजी न जमल्याने झाला पती-पत्नीत वाद

प्रतिनिधी १७ एप्रिल

आर्णी : तालुक्यातील बोरगांव येथे काल रात्री केवळ 'भाजी चांगली जमली नाही' या क्षुल्लक कारणावरून पती-पत्नीत जोरदार वाद झाला. रागाच्या भरात पत्नीने घरातील विष प्राशन करून आत्महत्या केली. या घटनेत पतीला पोलिसांनी अटक केली आहे.

चेतना मनोज जाधव असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. बोरगाव येथील मनोज नामदेव जाधव यांचे लग्न देवगाव येथील

चेतना मनोज जाधव यांच्याशी झाले होते. या जोडप्याला एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. मनोज दारूच्या व्यसनामुळे नेहमीच पत्नी चेतनाला त्रास देत होता आणि किरकोळ कारणांवरून वाद घालत होता. काल रात्री मनोज आपल्या एका मित्राला घरी घेऊन आला. दोघे जेवणासाठी बसले असताना चेतनाने ताट वाढले. जेवताना मनोजने 'भाजी चांगली झाली नाही' या कारणावरून चेतनाशी शिवीगाळ करत रागावून वाद घातला. रागाने चेतना आतल्या खोलीत गेली, घरात असलेली विषाची बाटली घेऊन पूर्ण पोट भरून विष पिऊन बाहेर आली. तिने सांगितले, "मी यथेच्छ विष प्यायले आहे, आता तुम्ही सर्वजण शांत राहा." कुटुंबीयांनी तिला तातडीने आर्णी ग्रामीण दवाखान्यात नेले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

मृतक चेतना यांच्या मामाने मनोहर गणु राठोड यांनी आर्णी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरुन पोलिसांनी मनोज नामदेव जाधव विरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपी मनोजला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

महसूल कारवाईत वाळू माफियांचा थरार! दोन ट्रकच्या कचाट्यात कारचा चक्काचूर

पोलिसांना 'काहीच माहिती नाही'?

प्रतिनिधी १७ एप्रिल

राळेगाव : आगीच्या पंचनाम्यात गुंतलेल्या प्रशासनाच्या नजरेआड, वाळू माफियांनी राळेगाव-वडकी मार्गावर अक्षरशः थरार माजवला. महसूल विभागाने अवैध वाळू वाहतूक करणारे तीन ट्रक पकडताच तस्करांची पळापळ उडाली आणि त्याच गोंधळात दोन अवजड ट्रकच्या कचाट्यात एक कार सापडून तिचा अक्षरशः चक्काचूर झाल्याची धक्कादायक घटना वर्धा बायपासवरील नायरा पेट्रोल पंपाजवळ घडली.

मेटीखेडा रोडवरील महावीर जिनिंग फॅक्टरीतील आगीचा पंचनामा आटोपून परतत असताना महसूल पथकाच्या नजरेस रात्रीच्या अंधारात संशयास्पदरीत्या धावणारे ट्रक पडले. तत्काळ कारवाई करत अधिकाऱ्यांनी तीन ट्रक जागीच जप्त केले. मात्र, ही कारवाई समजताच मागून येणाऱ्या वाळू तस्करांच्या वाहनांमध्ये एकच गोंधळ उडाला. याच गडबडीत 'लोकेशन' देणाऱ्या कारला पाठीमागून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका जबरदस्त होता की, कार समोरील दुसऱ्या ट्रकवर आदळली आणि दोन ट्रकच्या मध्ये अडकून पूर्णपणे चिरडली गेली. काही क्षणांतच कारचा लगदा झाल्याने उपस्थित महसूल अधिकाऱ्यांसमोरच हा भयावह प्रकार घडला. घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, इतका मोठा अपघात आणि महसूल विभागाची कारवाई होऊनही स्थानिक पोलीस प्रशासन 'अनभिज्ञ' असल्याचे समोर आले आहे. एवढेच नव्हे तर, रातोरात अपघातग्रस्त वाहने आणि अवैध वाळू घटनास्थळावरून गायब करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे पुरावे जाणीवपूर्वक नष्ट करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. या घटनेने राळेगाव-वडकी मार्गावरील अवैध वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, 'हे सर्व कोणाच्या छत्रछायेखाली?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

अक्षय तृतीयेपूर्वी प्रशासन अलर्ट : बालविवाह लावल्यास थेट कारवाई

प्रतिनिधी १७ एप्रिल

यवतमाळ : अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. १९ एप्रिल रोजी होणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये बालविवाह होऊ नयेत, यासाठी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बालविवाह आढळल्यास संबंधितांवर थेट कारावासाची कारवाई होणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने सांगण्यात आले की, कायद्यानुसार मुलाचे किमान वय २१ वर्षे आणि मुलीचे १८ वर्षे असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा ठरतो. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक तर शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील आणि अंगणवाडी सेविकांना विवाहापूर्वी वधू-वरांचे वय तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

'एक वही, एक पेन' उपक्रमातून बाबासाहेबांना अभिवादन

अनामी फाउंडेशनचा अभिनव उपक्रम; गरजू विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात

प्रतिनिधी १७ एप्रिल

यवतमाळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अनामी फाउंडेशनतर्फे राबविण्यात आलेला 'एक वही, एक पेन' हा अभिनव उपक्रम यंदाही उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वी ठरला. साधी वाटणारी ही संकल्पना गेल्या काही वर्षांत व्यापक सामाजिक परिणाम घडवून आणत असून आंबेडकरी विचारांची तळागळापर्यंत रुजवात करण्यास हातभार लावत आहे.

महामानव, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त हार-फुलांऐवजी अनुयायांनी मोठ्या प्रमाणावर वही, पेन व इतर शैक्षणिक साहित्य अनामी फाउंडेशनच्या स्टॉलवर भेट स्वरूपात जमा केले. "शिक्षण हेच सर्व सामाजिक समस्यांवर प्रभावी

औषध आहे," हा बाबासाहेबांचा विचार प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत आहे.

देशात विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण चिंताजनक असताना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे ही मोठी गरज आहे. शेतकरी, कष्टकरी व कामगार कुटुंबातील अनेक विद्यार्थी शैक्षणिक सुविधांच्या अभावामुळे मागे पडताना दिसतात. अशा परिस्थितीत हार-फुलांवरील खर्च टाळून शैक्षणिक साहित्याच्या रूपाने मदत करण्याची ही संकल्पना प्रभावी ठरत आहे.

या उपक्रमासाठी सिद्धार्थ भवरे, दिपक नगराळे, बळीराम अडागळे, विलास वानखडे, सचिन आठवले, प्रफुल शंभरकर, आनंद देवगडे, शंतनू देशभ्रतार, आशिष खडसे, मंगेश चव्हाण, अजय शेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सावत्र मुलाची हत्या; आरोपीस जन्मठेप

प्रतिनिधी १७ एप्रिल

यवतमाळ : बाभुळगाव तालुक्यातील दाभा येथे घडलेल्या सावत्र मुलाच्या खून प्रकरणी न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. मुनघाटे यांनी गुरुवारी दि. १६ एप्रिल २०२६ हा निकाल दिला. देविदास नामदेवराव कोडापे (वय ४५, रा. दाभा, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे.

सदर आरोपीने आपल्या सावत्र मुलगा राहुल (वय अंदाजे ७ वर्षे) यास मारहाण करून विहिरीत ढकलून देत हत्या केली होती. या गुन्ह्याबद्दल भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अन्वये आरोपीस जन्मठेपेची शिक्षा तसेच ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, दंड न भरल्यास तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. घटनेनुसार, आरोपीचा पत्नीशी वाद सुरू असल्याने तो घटनेच्या आठ दिवसांपूर्वी मुलांसह दाभा येथे आला होता. दि. १ जानेवारी २०२३ रोजी दुपारी साडेएक वाजताच्या सुमारास त्याने सावत्र मुलगा राहुल यास काठीने मारहाण करून विहिरीत ढकलून दिले. या घटनेत मुलाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी बाभुळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक एम. बी. डांगे यांनी करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले.

साक्षीदारांचे जबाब व परिस्थितिजन्य पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील ॲड. नरेंद्र एन. पांडे यांनी काम पाहिले. त्यांना बाभुळगाव पोलीस ठाण्यातील कर्मचारी संजय कासार यांचे सहकार्य लाभले.

दिव्यांगाची न्यायासाठी आर्त हाक; उपविभागीय कार्यालयासमोर आंदोलन

प्रतिनिधी १७ एप्रिल

उमरखेड : अर्ध्या मालकीच्या जागेचा स्वतंत्र ७/१२ उतारा व ७/११ फेरफार करून मिळावा, या मागणीसाठी दिव्यांग स्वप्निल मधुकर पाटील यांनी आपल्या बहिणीसह १५ एप्रिलपासून उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

स्वप्निल पाटील (रा. नाथनगर, सध्या चाळीसगाव) व त्यांची बहीण वृषाली पाटील हे उमरखेड नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्रमांक १०/१ मधील प्लॉट क्रमांक १५ या मिळकतीचे सामायिक मालक आहेत. संबंधित जागेचे क्षेत्रफळ २५८.८७ चौ.मी. असून त्यावर २१ चौ.मी. बांधकाम आहे. या जागेबाबत सर्वांच्या संमतीने खरेदीखत नोंदवून नमुना ८ असेसमेंट व नकाशा देखील तयार करण्यात आला आहे.

मात्र, अर्ध्या हक्काच्या जागेसाठी स्वतंत्र ७/१२ उतारा व ७/११ फेरफार

करून देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी महसूल खात्याकडे केली आहे. यासाठी सहमालक बालाजी गंगाधर साखरे (रा. उमरेड, जि. नागपूर), जे पोलीस खात्यात कार्यरत आहेत, यांच्याकडे अनेक वेळा विनंती करण्यात आली. तथापि, त्यांनी सहकार्य न करता उलट पदाचा धाक दाखवत टाळाटाळ केल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.

यामुळे अखेर न्याय मिळवण्यासाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे स्वप्निल पाटील यांनी सांगितले. महसूल प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पुसदमध्ये 'विद्यालंकार्स पोदार'चा CBSE दहावीत 100% निकाल

प्रतिनिधी १७ एप्रिल

पुसद : शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा जपत विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल, पुसदने CBSE इयत्ता दहावीच्या निकालात पुन्हा एकदा दणदणीत यश मिळवले आहे. यंदाही शाळेने 100 टक्के निकालाची किमया साधत सलग तिसऱ्या वर्षी जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले असून, उत्कृष्टतेचा नवा मापदंड निर्माण केला आहे.

यावर्षी शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गुणवत्तेची उंची अधिक भक्कम झाली आहे. तब्बल 6 विद्यार्थ्यांनी 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले, तर 19 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक आणि 37 विद्यार्थ्यांनी 85

टक्क्यांहून अधिक गुण मिळवत यशाची परंपरा कायम ठेवली.

गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अंतरीक्ष अविनाश आडे (98%) प्रथम क्रमांकावर राहिला. त्यापाठोपाठ आराध्या रमेश चव्हाण (97.4%), निपुण आशिष कदम (97%), आरुषी सुरेश असोले (96.4%), शरयू रघुवीर चाटरमल आणि सृष्टी संतोष नरवाडे (प्रत्येकी 95.2%) यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

या यशात देवांशी सचिन शिंदे (93.4%), दिवा अतीश वाघमारे (93%), श्रद्धा रमेश गंगाखेडे (92.8%), पार्थ तुकाराम चव्हाण (92.4%), खुशी शिवाजी शिंदे (92.2%), अथर्व दत्तात्रय लोखंडे (92%), अवंती गजानन नारनवरे (91.6%), आयुष प्रफुल्ल अकोलकर, समर्थ राजेश्वर सोळंके, रोहित गजानन ढोरे (प्रत्येकी 91.2%), अंशुल रवींद्र लोहिया (90.8%), स्मही संदीप निलावार व वेदांत संतोष मारकड (प्रत्येकी 90.4%) यांचाही समावेश आहे.

या अभूतपूर्व यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि शाळेचे आधुनिक शैक्षणिक वातावरण हे महत्त्वाचे घटक ठरले. नियमित सराव परीक्षा, संकल्पनांवर आधारित अध्यापन आणि 'डाऊट सॉल्व्हिंग' सत्रांमुळे विद्यार्थ्यांची भक्कम तयारी झाली.

या यशाबद्दल प्राचार्या श्रीमती राधा धागमवार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या संचालक मंडळातील शरद मैंद, सूरज डुबेवार, संतोष अग्रवाल, मनिष अनंतवार आणि संगमनाथ सोमावार यांनीही विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत, "ही मेहनतीची गोड कमाई आहे," अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

पाणीटंचाईवर नियंत्रणासाठी प्रशासन सज्ज राहावे : पालकमंत्र्यांचे निर्देश

प्रतिनिधी १७ एप्रिल

यवतमाळ : जिल्ह्यात पाणीटंचाईची समस्या उद्भवू नये यासाठी प्रशासनाने पूर्वतयारीसह सज्ज राहून काम करावे, असे निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले. गुरुवारी महसूल भवन येथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी विविध उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीत आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक ऊईके, आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील कोणत्याही भागात पाण्यासाठी नागरिकांच्या तक्रारी येऊ नयेत, यासाठी सर्व

विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत धरणे व बंधाऱ्यांतील पाणीसाठा, पर्जन्यमान, जलसंधारण, भूजल पातळी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, ग्रामीण व शहरी पाणी योजना, जलजीवन मिशन आदी विषयांचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. ग्रामीण पाणीपुरवठा योजना, नळपाणी योजना आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

दरवर्षी टँकरवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या जिल्ह्यातील चार गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, पुसद तालुक्यातील येलदरी, बुटी (ई), कारला आणि आर्णी तालुक्यातील कारेगाव या गावांचा त्यात समावेश आहे.

दरम्यान, खाजगी विहिरी अधिग्रहणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. ग्रामसभेत विहीर अधिग्रहणाचा ठराव मंजूर झालेल्या दिवसापासूनच संबंधितांना मोबदला देण्याचे निश्चित करण्यात आले.

पाणीटंचाईबाबत शासन गंभीर असून, कामात निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पालकमंत्र्यांनी यावेळी दिला.

सामाजिक-शैक्षणिक उपक्रमातून फुले-आंबेडकर जयंती

चिकणी (डो.) येथे तरुणांचा पुढाकार; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याचा संकल्प

प्रतिनिधी १७ एप्रिल

यवतमाळ : नेर तालुक्यातील चिकणी (डो.) येथील तरुणांनी यंदा क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवून उत्साहात साजरी केली. या उपक्रमांद्वारे त्यांनी महामानवांना अभिवादन करत समाजाप्रती बांधिलकी जपली. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिकणी डोमगा येथील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याचा व शाळेच्या विकासाचा संकल्प केला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षिका शशिकला डोंगरे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण अरसोड, सामाजिक न्याय

विभागाचे जिल्हाध्यक्ष अमोल गणवीर, मुख्याध्यापक पंडीत वैद्य , शिक्षक मनोज माथने, कल्पना वैद्य, मिनाक्षी निमट, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुग्रीव बांबोर्डे, शालू डोंगरे, नीता बोरकर, सुनिता चव्हाण, आरती बोरकर उपस्थित होते.

शाळेने आजवर अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले असून ते सामाजिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. जिल्हा परिषद शाळांचा विकास व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

यावेळी माजी शिक्षक शशिकला डोंगरे, कल्पना वैद्य (बोंद्रे), मिनाक्षी निमट, मनोज माथने, प्रभुचरण कोल्हे यांचा माजी विद्यार्थ्यांकडून सत्कार करण्यात आला. महादीप परीक्षेत यश मिळवत विमानचालन क्षेत्रात झेप घेणारा गुणवंत विद्यार्थी आयुष गोगटे याचा भारतीय संविधानाची प्रत देऊन गौरव करण्यात आला. शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी शाळेला स्मार्ट गुगल टीव्ही देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना वह्या व पेनांचे वाटप करण्यात आले. अनाथ, एकल पालकत्व असणारे, दिव्यांग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संजय डोंगरे, नीलकमल बोरकर, देवानंद बोरकर, विनोद चव्हाण, ताराचंद बोरकर, धम्मपाल मेश्राम, प्रमोद मेश्राम, योगेश रामटेके, धर्मेशसेठ गणवीर, गौतम मेश्राम, धम्मपाल घरडे, प्रफुल घरडे, धम्मपाल रामटेके, अमोल मेश्राम, सुशील घरडे, रवी मेश्राम, सुमेध चव्हाण, मिलिंद वासनिक, राहुल वासनिक, अमोल वासनिक, सुहास मडके, राजकमल बोरकर, सुधीर कापसिकर, राजकुमार मेश्राम आदींसह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नपाल रामटेके यांनी केले, तर आभार प्रदर्शन ताराचंद बोरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी कापसीकर, संघपाल वासनिक, अमोल चव्हाण, अनिल बोरकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

सुकळी (ज) च्या सरपंचपदी श्रद्धा बोके बिनविरोध

दीड वर्षानंतर सरपंचपदाची निवड प्रक्रिया

प्रतिनिधी १७ एप्रिल

उमरखेड : सुकळी (ज) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी श्रद्धा बोके यांची बिनविरोध निवड झाली आहे. दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या या पदासाठी अखेर प्रशासनाकडून निवड प्रक्रिया राबविण्यात आली.

माजी सरपंच प्रणाली मस्के यांच्यावर ग्रामसभा न घेणे आदी विविध आरोप सिद्ध झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना अपात्र ठरवून पद रिक्त केले होते. त्यानंतर सरपंचपदाचा प्रभार उपसरपंचांकडे सोपविण्यात आला होता. तब्बल दीड वर्षानंतर १५ एप्रिल रोजी प्रशासनाने सरपंच निवडीची प्रक्रिया पार पाडली.

या निवडणुकीत नऊ सदस्यांपैकी केवळ श्रद्धा बोके यांचाच एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध सरपंचपदी निवड घोषित

करण्यात आली.

निवड जाहीर होताच माजी आमदार उत्तमराव इंगळे व नामदेवराव ससाने यांनी श्रद्धा बोके यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. अयुबखाँ पठाण, ज्ञानेश्वर कनवाळे, ज्ञानेश्वर बोके, राहुल वानखेडे, संतोष वानखेडे यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून प्रवेश परीक्षेसाठी मुदतवाढ

अमरावती: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेतली जाणारी राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज (RIMC), डेहराडून येथील प्रवेश पात्रता परीक्षेच्या अर्ज प्रक्रियेत महत्त्वाची सुधारणा करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम मुदतीत वाढ करण्यात आली असून आता २० एप्रिलपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी जाहीर प्रकटनाद्वारे दिली आहे.

राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेजची प्रवेश परीक्षा ७ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ एप्रिल २०२६ पर्यंत होती, ती आता वाढवून २० एप्रिल २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. डेहराडून येथील कमांडंट आर.आय. एम. सी. यांनी दिलेल्या सूचनेनुसार हा बदल करण्यात आला आहे.

अचलपूरमध्ये तरुणीवर अत्याचार प्रकरण : व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करा

प्रतिनिधी १७ एप्रिल

अमरावती : अचलपूर (परतवाडा) येथे एका तरुणीवर लैंगिक शोषण करून तिचा अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणाचा अमरावती शहर महिला काँग्रेसने तीव्र निषेध नोंदवला असून संबंधित आरोपींवर तसेच व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महिला काँग्रेसच्या अध्यक्ष जयश्रीताई राहुल वानखेडे यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन देत सांगितले की, ही घटना अत्यंत गंभीर असून केवळ एका तरुणीपुरती मर्यादित नसून संपूर्ण समाजाला काळिमा फासणारी आहे. या प्रकरणात मुख्य

आरोपींसह त्यांना मदत करणारे, व्हिडिओ बनवणारे व सोशल मीडियावर व्हायरल करणारे सर्व जण दोषी असून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे.

या घटनेच्या निषेधार्थ डॉक्टर अर्चना आतराम, किरण चांदवडकर, सीमा तिवारी, माया मालवीकर, रजनी घारडे, शद्दीन शरीक शेख, कांचन खोडके, शिल्पा राऊत, वृषाली मानकर, अश्विनी बोंडे यांनीही तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी प्रशासनाला आवाहन केले की, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे आणि अशा घटनांमध्ये तात्काळ व कठोर पावले उचलली पाहिजेत.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, या प्रकरणाची जलद गतीने चौकशी करून दोषींना कडक शिक्षा देण्यात यावी. अन्यथा अमरावती शहर महिला काँग्रेसतर्फे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

महिला काँग्रेसने प्रशासनाकडून तातडीने सकारात्मक आणि कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे.

अमरावतीत उद्यापासून महात्मा बसवेश्वर जयंतीचा जल्लोष

प्रतिनिधी १७ एप्रिल

१९ ला भव्य शोभायात्रा व 'सारेगमप लिटील स्टार' जलसंध्या

अमरावती : शहरातील वीरशैव लिंगायत समाजातर्फे यंदाही महात्मा बसवेश्वर जयंती १८ ते २० एप्रिल २०२६ दरम्यान उत्साहात साजरी केली जाणार आहे. जुन्या शहरातील श्री. मृगेंद्र मठ संस्थान, अंचागेट येथे विविध सांस्कृतिक, बौद्धिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१९ एप्रिल रोजी जयंतीनिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. त्याच दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांसह 'सारेगमप लिटील स्टार'ची जलसंध्या हे विशेष आकर्षण असणार आहे. या कार्यक्रमासाठी समाजबांधवांकडून जोरदार तयारी सुरू आहे.

महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील महान समाजसुधारक होते. त्यांनी कर्मकांडाला विरोध करत समाजात समानता, साधेपणा आणि विचारांची मोकळीक यांचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, यासाठी हा उत्सव साजरा केला जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या जयंती उत्सवाचे आयोजन वीरशैव शिक्षण प्रसारक मंडळ, वीरशैव विकास समिती, वीरशैव महिला मंडळ आणि शिवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष संगीता सौंदळे, कार्याध्यक्ष विजय ओडे, उपाध्यक्ष संजयआप्पा मुंजाळे, शितल कुन्डे, सचिव उध्दवआप्पा गाडेकर, कोषाध्यक्ष कैलास गिलोरकर यांच्यासह आयोजन समितीतील सर्व सदस्यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शिवा संघटना मनोहर धोंडे, प्रमुख उपस्थिती आमदार मुर्तीजापुर विधानसभा मतदारसंघ हरीश पिंपळे, प्रमुख अतिथी अध्यक्ष हिरकणी महिला अर्बन कॉपरेटिव क्रेडिट सोसा हिरकणी महिला उत्कर्ष प्रतिष्ठान चिखली वृषाली बोंद्रे, समाजसेवक अकोला सुरेंद्र हुंडीवाले, समाजसेवक नागपूर शिरीष रामापुरे, प्रवीण भाऊ हरमकर, जयेश हातगावकर, विरोधी पक्षनेते तथा माजी महापौर विलास भाऊ इंगोले, नगरसेवक तथा संपादक दैनिक अमरावती मंडळ अनिल अग्रवाल, नगरसेवक संजय राव तीरथकर, नगरसेवक संजय शिरभाते, नगरसेवक योगेश विजयकर, नगरसेविका ललिता रतावा, नगरसेवक सुनिता भेले हे उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या कार्यक्रमात अमरावतीचे नीरज सुरेश तिवारी द्विभाषिक म्हणून उपस्थित

प्रतिनिधी १७ एप्रिल

अमरावती : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा येथे सहावा दीक्षांत समारंभ १६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला या निमित्य भारताच्या राष्ट्रपती व विश्वविद्यालयाच्या कुलाध्यक्षा श्रीमती द्रोपती मुमु? ह्या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार म्हणून अमरावती नूतन मूकबधिर विद्यालय येथील विशेष शिक्षक . नीरज सुरेश तिवारी यांना या कार्यक्रमाला द्विभाषिक (इंटरप्रीएटर) म्हणून बोलविल्या गेले . नीरज तिवारी यांनी याआधी सुद्धा नागपूर येथे झालेल्या

राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाला द्विभाषिक (इंटरप्रिएटर) म्हणून कामगिरी बजावली असल्यामुळे पुन्हा वर्धा येथे होणाऱ्या कार्यक्रमाला सुद्धा त्यांना बोलावले गेले आहे. अमरावती जिल्हा करीत ही एक मानाची व गर्वाची बाब आहे कार्यक्रमाला उपस्थित मूकबधिर दिव्यांगांन पर्यंत राष्ट्रपतींचा संदेश पोहोचावा याकरिता म्हणून श्री. नीरज तिवारी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे श्री नीरज तिवारी यांची सांकेतिक भाषेवर जोरदार पकड असल्याने ते संपूर्ण कार्यक्रमाचे विश्लेषण करू शकतात व द्विभाषिक म्हणून उत्तम कामगिरी बजावतात म्हणून महाराष्ट्रात होणाऱ्या अशा मोठ्या कार्यक्रमांमध्ये द्विभाषिक म्हणून त्यांना बोलाविले जाते ते द्विभाषिक म्हणून निशुल्क सेवा देतात.

त्यांच्या या निवडीकरिता व कामाकरिता संपूर्ण जिल्हाभर त्यांचे कौतुक केले जात आहे मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद अमरावती मा. श्री. सत्यम गांधी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री. बाळासाहेब रायबोले, सहाय्यक सल्लागार दिव्यांग विभाग श्री. पुरुषोत्तम शिंदे यांच्या सह संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक व कर्मचारी यांनी त्यांचे कौतुक केले आहे. नीरज तिवारी आपल्या यशाचे श्रेय त्यांची आई सुरेखा तिवारी मोठे बंधू . धीरज तिवारी व पत्नी आरती तिवारी यांना देतात त्यांच्या सहकार्यानेच ते पुढे जाऊ शकलो आहे असे त्यांचे मत आहे.

जिल्हा पोलिस दलाला आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

प्रतिनिधी १७ एप्रिल

४७ आपत्ती प्रतिसाद किटचे वाटप

अमरावती : जिल्ह्यात उद्भवणाऱ्या आपत्तीला तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी आणि जिल्हा शोध व बचाव पथक घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष पुढाकार घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर यांच्या निर्देशानुसार, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून जिल्ह्यासाठी 'आपत्ती प्रतिसाद किट' उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रामीण आणि शहर पोलीस दलाला ४७ आपत्ती प्रतिसाद किट वाटप करण्यात आली आहे. या संदर्भात गुरूवार, दि. १६ एप्रिल रोजी

पोलिस कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर पार पडले. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे अध्यक्षस्थानी होते.

पोलिस कर्मचाऱ्यांना आपत्ती काळात अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यात आपत्ती व्यवस्थापन किट हाताळणे, मोठी व मध्यम आकाराचे स्ट्रेचर, लाईफ जॅकेट, हॅडग्लोज, गमबूट, सेप्टी नेट, ३० मीटर रॅपलिंग रोप आणि किट स्टोरेज बॉक्सचा वापर करण्याबाबत प्रात्यक्षिक देण्यात आले. तसेच वैद्यकीय प्रथमोपचार सीपीआर, आपत्तीमध्ये जखमींना उचलण्याच्या पद्धती आणि प्राथमिक उपचार, यासह विविध आपत्तींचा सामना, पूर, आग, वीज कोसळणे, भूकंप आणि उष्माघातासारख्या परिस्थितीत घ्यावयाची काळजी व कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली. या नाविन्यपूर्ण प्रशिक्षणामुळे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास निवासी उपजिल्हाधिकारी श्री. काकडे यांनी व्यक्त केला.

सदर प्रशिक्षणात मार्गदर्शक म्हणून क्रिएटिव न्यू टेक लिमीटेडचे प्रा. डॉ. विलास बैले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग पचौरी, सहायक पोलीस उपनिरीक्षक मोहन भारसाकडे, श्री. कढाणे आणि संतोष कविठकर उपस्थित होते. सुरेंद्र रामेकर यांनी प्रास्ताविक केले, सचिन धरमकर, विशाल निमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य आणि सुमीत बांबल यांनी प्रशिक्षणासाठी सहकार्य केले.

आज रंगणार बुद्ध-भीम गीतांची बहारदार मैफील

प्रतिनिधी १७ एप्रिल

समाज कल्याण विभागाचा पुढाकार

अमरावती : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून आयोजित 'सामाजिक समता सप्ताहा' निमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे. समाज कल्याण विभाग, अमरावतीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुद्ध-भीम गीतांच्या बहारदार मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते समता, न्याय आणि बंधुतेचे प्रणेते होते. समाजातील अस्पृश्यता, जातीयता आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. महिला आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन करत त्यांनी कायद्याच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची चळवळ उभी केली. अशा या थोर युगपुरुषाच्या विचारांचे स्मरण करणे आणि त्यांच्या कार्याला संगीतमय मानवंदना देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी नागरिकांना या प्रबोधनात्मक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या देशात महिला पत्रकारांचा अपमान खपवून घेतल्या जाणार नाही

प्रतिनिधी १७ एप्रिल

प्रवीण तोगडिया यांच्या विरोधात जिल्हा कचेरीवर निदर्शने

अमरावती : आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रमुख प्रवीण तोगडिया यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वाखाली, बुधवारी (१५ तारखेला) रोजी जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या देशात महिला पत्रकारांचा अपमान खपून जाणार नाही, प्रवीण तोगडिया मुर्दाबाद, प्रवीण तोगडिया मुर्दाबाद, जातीयवादी प्रवीण तोगडिया यांच्यावर कारवाईची करण्याची मागणी यावेळी पत्रकार संघटनेतर्फे करण्यात आली.

महिला पत्रकारांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना रस्त्यावर उतरली आहे.

अमरावती शहरात आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रमुख प्रवीण तोगडिया यांनी महिला पत्रकारांना आपली जात विचारून त्यांचा अवमान केला होता. पत्रकारांना जात विचारणे ही घटना अत्यंत निंदनीय असून पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर आणि महिलांच्या प्रतिष्ठेवर हल्ला आहे. विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांनी माध्यमांना सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांना समाजाचा चौथा स्तंभ मानले जाते. अशा परिस्थितीत, महिला पत्रकारांना अपमानजनक आणि भेदभावपूर्ण वागणूक देणे हे चुकीचे आहे.

प्रशासनाने महिला पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत. यावेळी, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन सुरू करण्याचे संकेत जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकर यांनी दिले. आंदोलन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ विदर्भ राज्य अध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार, जिल्हा संघटक विनोद इंगळे, स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील घाटाळे डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष मनीष गुढे, योगिनी आडक, महिला अध्यक्षा अर्चना राक्षे, जया मेहरो, विष्णू अमरावती, विष्णू पाटील आदी उपस्थित होते. खडसे बंडूकुमार धवणे, सुरेश तायडे, समीर अहमद सिद्धार्थ दामोदरे आदेश मेटांगे मोरेश्वर पवार, अमोल तायडे, नीलेश आहेर, अरविंद नागराळे, छत्रपती बांबोडे, तुळशीदास मेश्राम, विनोद मुळे पाटील, धनराज खारचन, अजय श्रृंगारे, गजानन भोळे यांच्यासह अनेक अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. या आंदोलनात विविध पत्रकार संघटना आणि पत्रकार सहभागी झाले होते.

२० एप्रिलनंतर कमाल तापमानात घट

हवामान तज्ञ प्रा. अनिल बंड यांचा अंदाज

प्रतिनिधी १७ एप्रिल

अमरावती: हवामान १६ एप्रिल एक पश्चिमी विक्षोभ हिमालयावर सक्रिय असून दुसरा उद्या रात्री हिमालयावर पोहचणार आहे. भुमध्य समुद्रावर चक्राकार वारे वाहत आहेत. हरियाणा बंगला देश ईशान्य मध्य प्रदेश कर्नाटक वर सुद्धा चक्राकार वारे आहेत.

ईशान्य मध्य प्रदेश विदर्भ तेलंगणा कर्नाटक मन्नारचे आखात पर्यंत कमी दाबाची द्रोणिय स्थिती आहे.

उष्णतेची लाट: विदर्भात २० तारखेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहिल.

कमाल तापमान ४५ष्ट च्या थोडे पुढे जाण्याची शक्यता आहे.

१९ तारखेपासून वातावरण ढगाळ होणार असल्याने २० तारखेनंतर कमाल तापमानात घट येण्याची शक्यता आहे. असा अंदाज हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी व्यक्त केला आहे.

पाऊस: २०,२१,२२ एप्रिलङ पश्चिमी विक्षोभ च्या प्रभावामुळे विदर्भात ढगाळ वातावरण तयार होऊन तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची गडगडाटासह शक्यता आहे.

त्यानंतर थोड्या काळासाठी कमाल तापमान आटोक्यात राहील.असे प्रा अनिल म. बंड म्हणाले.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षक नामतालिकेसाठी (पॅनल) अर्ज आमंत्रित

प्रतिनिधी १७ एप्रिल

अमरावती: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१) (ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम- ६९(१)(फ) आणि नियम १९६१ मधील तरतुदींनुसार, सहकारी संस्थाच्या लेखा परिक्षणांसाठी सन २०२६-२०२८ या कालावधीसाठी राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करण्यासाठी mahasahakar.maharashtra.goved.in या पोर्टलवर दि. २० एप्रिलपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

ऑनलाइन अर्ज संदर्भात परिपत्रकीय सूचना व सविस्तर माहिती सहकार विभाग/सहकार आयुक्त व सहकार निबंधक यांच्या संकेतस्थळावर आणि सर्व जिल्हा उपनिबंधक जिल्हा विशेष लेखापरीक्षक विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

उष्णतेच्या लाटेबाबत जिल्हा प्रशासनाचा इशारा

अमरावती: जिल्ह्यात येत्या तीन दिवसात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्याच्या तापमानात वाढ होणार असून नागरिकांनी याबाबत सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

भारतीय हवामान खात्याने विदर्भात येत्या तीन दिवस उष्णतेच्या लाटेबाबत इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारी उन्हात जाणे टाळावे, तसेच आवश्यक असल्यास उष्णतेपासून बचाव करण्याचा उपायाचा अवलंब करावा, असे आवाहन केले.

पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावती चा सी.बी.एस.ई. १० वी चा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी १७ एप्रिल

१०० टक्के निकालाची अखंड परंपरा कायम

अमरावती : येथील पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, कठोरा रोड , अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.ई. बोर्ड, दिल्ली मार्फत मार्च २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या वर्ग १० विच्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा शाळेचा निकाल हा उत्कृष्ट लागला. या परीक्षेमध्ये एकूण ७८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणांची परंपरा कायम ठेवत सी.बी.एस.ई. १० विच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. एकूण परीक्षेला बसलेल्या ७८ विद्यार्थ्यांमध्ये ९० ज्ञ् व त्यापेक्षा जास्त एकूण २४ विद्यार्थी तर ८०ज्ञ् टक्केच्या वर ३७ विद्यार्थी, ६०ज्ञ् ७२ पेक्षा जास्त मध्ये विद्यार्थी आले.

सी.बी.एस.ई. बोर्ड दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या १० विच्या परीक्षेमध्ये शाळेच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये यांनी गुण प्राप्त केले आहे. वेदिका मनोज देशमुख ९६.८०ज्ञ् , माही प्रफुल वऱ्हेकर ९६.४०ज्ञ् , स्वरा दिनेश हराळे ९६.२०ज्ञ् ,अमोघ राजेश भुते ९६.००ज्ञ् , सोनाली रोहितदास पाटील ९५.८०ज्ञ् , शमिका सिद्धार्थ ढोणे ९५.६०ज्ञ्, चिन्मय भास्कर तोंडे ९४.००ज्ञ् ,मानस नरेंद्र वानखडे ९४.००ज्ञ् ,आर्या नितीन अस्वार ९३.६०ज्ञ् , भाविक नरेंद्र वानखडे ९२.८०ज्ञ् , हंसिका प्रवीण मावले ९२.८०ज्ञ् , सायली अविनाश देशमुख ९२.८०ज्ञ् ,अर्जुन मुजुमले ९२.४०ज्ञ् , शिवम नंदकिशोर वानखडे ९१.४०ज्ञ्, प्रियांश शैलेश निकम ९१.००ज्ञ्, सिद्धेश प्रवीण पाटील ९०.२०ज्ञ्, खुशी राजेश बंग ९०.००ज्ञ्, स्वरा मोहन गाडे ९०.००ज्ञ्. इ. तसेच ६ विद्यार्थी मराठी ह्या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. तसेच ६ विद्यार्थी घ्ऊ ह्या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले .

यावेळी पी आर पोटे पाटील ग्रुप ऑफ एज्युकेशनल इन्स्टिट्यूशनचे अध्यक्ष श्री. प्रवीण पोटे पाटील, संस्था उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, त्याचबरोबर शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे सर,उप-प्राचार्या सोनल निस्ताने मॅडम, तसेच सर्वच शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल कौतुक केले व भावी शैक्षणिक प्रवासाकरिता शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे आई वडील तसेच पी आर पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षकांना दिले.

सिटी न्यूज वाशीम सुपरफास्ट
शुक्रवार दि १७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

२८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिन; विविध उपक्रमांद्वारे जनजागृतीला चालना

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार दि. १ एप्रिल, २०२५ रोजी २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात विविध विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निमित्ताने जिल्हास्तर तसेच ग्रामपातळीवर जनजागृतीपर कार्यक्रम, मार्गदर्शन शिबिरे, माहिती वितरण तसेच नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभतेने मिळावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. 'सेवा हक्क दिन' जनसहभागातून उत्साहात साजरा करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरिकांना वेळबद्ध सेवा मिळण्याचा हक्क प्रदान करण्यात आला असून, या कायद्याविषयी अधिकाधिक नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.तरी सर्व नागरिकांनी अधिनियमांतर्गत उपलब्ध सेवांची माहिती व लाभ घेण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराचा छंद...

आर्थिक देवाण-घेवाणसाठी 'क्युआस' मशिनी पाडल्या बंद !

*** नागरिकांना आर्थिक भुर्दंड * भ्रष्टाचारासाठी काहीही * बंद मशिनमुळे नागरिकांची तारांबळ**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हाधिकारी कार्यालयासह प्रत्येक तहसील कार्यालयात नागरिकांना वेळेवर कागदपत्र मिळावे यासाठी क्युआस मशिनही बसविण्यात आल्या आहेत. परंतु या मशिनमुळे भूमिअभिलेख व तहसील कार्यालयातील अधिकाऱ्याचे आर्थिक आवक कमी झाली. नागरिकांचे कामे सुलभ होवू लागले. मात्र नागरिकांना त्रास देण्याचा वसा घेतलेल्या विघ्नसंतोषी कर्मचाऱ्यांनी मिशनच बंद पाडल्याचा प्रकार समोर आला आहे. यावरून पैशासाठी अधिकारी व कर्मचारी काहीही करतात.

जिल्ह्यातील तहसील कार्यालयातील क्यूआस मशीन बंद पडल्याने तालुक्यातील नागरिकांना अडचणीला सामोरे जात कार्यालयातील अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांची मनधरणी करावी लागत असून दिवसभर या विभागाच्या दारात गर्दी दिसून येते आहे. मनधरणी करूनही पैसे दिवूनही अधिकारी व कर्मचारी अगावू पैशाची मागणी करत आहेत. नागरिकांना कोणत्याही वेळी लागणारे सातबारा, कोतवाल बुकाची नक्कल, फेरफार, आठ अ आदी कागदपत्रे ताबडतोब मिळावेत या साठी जिल्हाधिकारी यांच्या प्रयत्नाने जिल्हयातील सर्व तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात क्यूआस मशीन (ए टि डि एम) बसवण्यात आले . याचा फायदा नागरिकांना होत असे. या मशीन मुळे अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यावर ताण कमी झाला होता. मात्र गैरमार्गाने मिळणारा पैसाही बंद झाला होता. नागरिकांना त्रास देण्याची सवय असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हे पाहविल्या गेले नाही. त्यातील काही कर्मचाऱ्यांनी बुध्दी लढवून जिल्ह्यातील मशीन बंद पाडल्या आहेत. मशीन बंद असल्यामुळे अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पुन्हा नागरिकांकडून कागदपत्रासाठी वसूली अभियांन सुरू केले आहे. या मशीनमुळे नागरिकांच्याही पैशाची व वेळेची बचत होत असे परंतु गेल्या काही वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयासह तहसील कार्यालयातील ही मशीन बंद झाल्याने नागरिकांची अडचण होत आहे. फेरफार, कोतवाल बुकाची नक्कल आदी कागदपत्र मिळवण्यासठी तीन ते सात दिवस लागत आहेत. तसेच नागरिकांचा वेळ व पैसाही जास्तीचा खर्चल्या जात आहे. कागदपत्रे लवकर मिळवण्यासाठी 'चिरीमिरी'ची देवाण घेवाण करावी लागते अशी चर्चा नागरिकात आहे. तरी संबंधितांनी यामशीनच्या दुरुस्तीकडे लक्ष्य देऊन ही मशीन सुरू करून नागरिकांचा त्रास कमी करावा अशी मागणी नागरिकांना मधून होत आहे. भूमीअभिलेख कार्यालयात फेरफार नकल यासाठी सर्वसामान्यांना त्रास सहन करावा लागत असून वारसा हक्काच्या नोंदीसाठी वर्षवर्ष चकरा माराव्या लागत आहेत.

बंद पडलेल्या एटीडीएम मशीन सुरू करा - बंडू शिंदे

वाशीम : शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना सरकारी व खाजगी कामासाठी लागणारे सातबारा, आठ अ यासह इतर कागदपत्रे सहजगत्या मिळावी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात सुरु केलेली संगणकीकृत एटीडीएम मशीन यंत्रणा आजघडीला विविध कारणामुळे गेल्या काही वर्षापासून बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरीकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून ही कागदपत्रे मिळत नसल्यामुळे त्यांची इतर कामे रखडली आहेत. सदर एटीडीएम मशीन त्वरीत सुरु करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते बंडु शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देवून केली आहे.

निवेदनात शिंदे यांनी नमूद केले आहे की, डिजीटल सातबारा, आठ अ चे जुने व नवीन नमुने त्वरीत मिळण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये संगणकीकृत एटीडीएम मशीन लावल्या आहेत. काही दिवस ह्या मशीनी सुरु होत्या. परंतु गेल्या काही महिन्यापासून काही मशिनी बंद, बिघडलेल्या किंवा कोरोना संसर्ग होवू नये म्हणून बंद अवस्थेत आहेत.

सदर मशीन बंद असल्यामुळे विविध कागदपत्रे काढण्यासाठी शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधीतांना शासकीय कामासाठी लागणारी जुनी व नविन कागदपत्रे काढता येत नाहीत. सर्वसामान्यांना होणारा त्रास पाहता संबंधीत ठिकाणी असलेल्या ह्या एटीडीएम मशीनी त्वरीत सुरु करावी अशी मागणी शिंदे यांनी निवेदनाव्दारे प्रशासनाला केली आहे.

थोडक्यात

मंगरूळपीर येथे भिमजयंती उत्साहात साजरी

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

वाशिम मंगरूळपीर विधानसभेचे आमदार श्याम खोडे यांच्या उपस्थितीत भीम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात सर्वप्रथम आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करून सामूहिक वंदना घेण्यात आली.

यावेळी आमदार खोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर सखोल मार्गदर्शन केले.या वेळी संध्याताई विकल पंडित, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलंगे नगरसेवक नंदलाल पवार सर गटनेते गणेश खोडे ,सुनील मालपाणी, किशोर इंगोले, अभिषेक दंडे, राजेंद्र ठाकरे, डि एस बनसोड, सुभाष हातोलकर, ॲड.मिलिंद बोलके, सुदाम मनवर, जे के भगत, जयदेव शृंगारे, रमेश शृंगारे, प्रमोद बोलके, जयदेव शृंगारे, वसंत इंगोले, फकीरा शृंगारे, राजाभाऊ इंगोले, प्रेमकुमार इंगोले, गोपाल लबडे, गजेंद्र बेलखडे, महादेव आडोळे, विजय भोजने, व सर्व समता सैनिक दलाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचालन सोनोने यांनी तर आभार वसंत इंगोले यांनी मानले.

श्री.संत रविदास फाउंडेशन सामाजिक कार्याच्या नव्या अध्यायाची नांदी

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा नगरीत नव्याने स्थापन झालेली 'श्री संत रविदास फाउंडेशन' ही संस्था केवळ एका संघटनेची निर्मिती नसून, सामाजिक कार्याच्या नव्या अध्यायाची नांदी आहे, या संस्थेची प्रेरणा संत रविदासांच्या विचारांतून आलेली आहे, ही तिची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल.संत रविदासांनी मांडलेली समतेची, बंधुत्वाची आणि श्रमप्रतिष्ठेची भूमिका ही भारतीय समाजव्यवस्थेला दिशादर्शक ठरलेली आहे. जात, पंथ, आर्थिक स्थिती यांपलीकडे जाऊन माणूसपणाला केंद्रस्थानी ठेवणारा त्यांचा विचार आजही तेवढाच सुसंगत आहे.या विचारांना केवळ अभिवादन करण्यापेक्षा त्यांची अंमलबजावणी करण्याचा संस्थेचा निर्धार अधिक महत्त्वाचा ठरतो असे विचार आमदार सईताई डहाके यांनी येथे व्यक्त केले.

समन्वय, नियोजन आणि अंमलबजावणीद्वारे प्रगती साध्य करा - योगेश कुंभेजकर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन आणि एकत्रित समन्वयाने कामे पूर्ण करावीत. प्रत्येक विभागाने परस्पर सहकार्याची भूमिका स्वीकारून नागरिकहिताचे निर्णय तातडीने राबवावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

दि. १६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित बैठकीत निती आयोगाच्या इंडीकेटर्सचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी बोलत होते.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा, आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त प्रविण खंडारे , मुख्यमंत्री फेलो संकेत नरुटे, उपशिक्षणाकारी गजानन डाबेराव व यंत्रणा प्रमुखांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी क्षेत्राला प्राधान्य शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता पिकांना योग्य व स्थिर बाजारभाव मिळावा यासाठी आवश्यक प्रक्रिया त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

अवैध सावकारीवर मोठी कारवाई ; वाशिममध्ये ज्वेलर्सची झडती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम तालुक्यात अवैध सावकारी व्यवहारांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार विभागाने मोठी कारवाई करत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत झडतीची कार्यवाही केली. ही कारवाई रुख्मीनी ज्वेलर्स, प्रो.प्रा. सुशिल चिमणाजी बेदरकर, वाशिम येथे दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने पार पाडली.

झडतीदरम्यान संबंधित ठिकाणाहून पुढील चौकशीसाठी महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. अवैध सावकारी व्यवहारांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाने ही कारवाई निर्णायक पाऊल मानले जात आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक अनुज तारे तसेच विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण कार्यवाही करण्यात आली.या मोहिमेत सहायक निबंधक एम. डी. कच्छवे, मुख्य लिपिक आर. वाडेकर, एस. जी. गादेकर, वरिष्ठ लिपिक ए. बी. सावंत तसेच सहायक सहकार अधिकारी आर. एन. शेख यांच्यासह पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध सावकारी व्यवहारांविरोधात पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाईल. अशी माहिती सहायक निबंधक (प्रशा) अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम आर. आर. सावंत यांनी दिली आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्याने रस्त्यावर शुकशुकाट

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जिल्हयात गेल्या आठवडाभरापासून उन्हाची तीव्रता वाढल्याने दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. सद्यस्थितीत उन्हाचा पार ४० अंशावर गेला असल्याने आगामी काळात उन्हाच्या झळा वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत आहे. उन्हाची तीव्रता अचानक वाढल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत असून कुलरचा वापर वाढला आहे.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच कडाक्याचे ऊन जाणवत असल्याने त्याचा परिणाम वाहतूक, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामकाजावर होत असल्याने जनजीवन प्रभावित झाले आहे. दुपारी बारानंतर उन्हाचे चटके जाणवत असल्याने कामानिमित्ताने घराबाहेर पडणारे नागरिक उन्हापासून सुरक्षिततेची काळजी घेवून बाहेर पडत आहेत. वाढत्या उन्हाचा परिणाम वाहतूक वर्दळीसह हातगाडीधारक विविध वस्तू विक्रेते तसेच फेरीवाले यांच्या व्यवसायावर देखील झाला आहे. दुपारच्या वेळी उन्हाचे चटके सहन करावे लागत असल्यामुळे मुख्य रस्त्यावरची वाहतूक विरळ झाल्याचे चित्र दिसून येते आहे. दरदविशी देवदर्शनासाठी भाविकांच्या गर्दीमुळे भरगच्च होणारी मंदिरे उन्हामुळे दुपारच्या वेळी ओस दिसून येत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच नागरिकांना उन्हाची तीव्रता सहन करावा लागत असून जिवाची लाहीलाही होत असल्याचे चित्र आहे.मागील आठवड्यापासून उन्हाच्या तिव्रतेत काही प्रमाणात वाढ झाली. पुढील आठवड्यात उन्हाच्या पारा ४२ ते ४३ अंशावर जाण्याची शक्यता आहे.त्यामुळे नागरीकांनी अत्यावश्यक कामासाठीच दुपारच्या वेळी घराबारहेर पडावे. अशावेळी उन्हापासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी. उष्माघाताची शक्यता वाटत असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उन्हाची तिव्रता पाहता नागरीकांनी आरोग्य जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- बाळासाहे बोराडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, वाशीम उन्हाची तीव्रता वाढल्याने थंडगार लस्सी, ताक , मठ्ठा, शीतपेय बर्फ गोळा या वस्तूंना मागणी वाढली आहे.दुपारच्या वेळी गावखेड्यासह शहरातील गल्लीबोळात ऊसाचा रस, आईस्क्रीम, बर्फ गोळे विक्रेते फिरताना

संतुलीत आहार ठेवा

उन्हाळा येऊन दाखल झाला आहे. तापमानातही परिवर्तन व्हायला सुरुवात झाली आहे. तप्त दुपार आणि गरम हवा शरीरावरही परिणाम करतेच. त्यामुळे उन्हाळा आल्यानंतर तुमच्या जेवणाच्या दिनचर्येतही बदल गरजेचा आहे.उन्हाळयात अधिक तेलकट खाणे नुकसानदायक ठरू शकते. त्यामुळे संतुलित आहाराची आवश्यकता असते. दिवसाची सुरुवात एक लीटर पाणी किंवा लिंबू पाण्याने करा. दिवसभर जास्तीत जास्त पाणी पिणेही आवश्यक असते.

कायदेविषयक जनजागृतीसाठी पार्डी टकमोर येथे प्रभावी कार्यक्रम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पारेश्वर मंदिर, पार्डी टकमोर (ता. जि. वाशिम) येथे दि.१३ एप्रिल २०२६ रोजी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या राज्य गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम अनिल सुब्रमण्यम् हे उपस्थित होते. यावेळी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम व्ही. जी. चौखंडे यांनी उपस्थितांना विविध कायदेविषयक बाबींवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम ॲड. अनुप बाकलीवाल यांनी 'नालसा (जागृती योजना, २०२५)' या विषयावर सविस्तर माहिती दिली. तसेच उपाध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम ॲड. वैभव तिफणे यांनी 'बालविवाह प्रतिबंध कायदा' याबाबत जनजागृती केली. सचिव, वकिल संघ, वाशिम ॲड. डी. डी. गुडदे यांनी 'पोक्सो कायदा' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी मोहन चौधरी, बोरकर महाराज, संतोष चौधरी (पोलीस पाटील) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, प्रस्तावना व आभार प्रदर्शन सुरेश उगले यांनी केले.या कार्यक्रमाला पार्डी टकमोर येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

विवाहितेचा छळ; सासरकडील ७ जणांविरूध्द गुन्हा

मलकापूर : हुंडयाची मागणी करुन सतत मानसिक व शारीरिक छळ सासरकडील मंडळी करीत असल्याची तक्रार विवाहितेने दिल्यावरून सासरकडील ७ जणांविरूध्द शहर पो. स्टे. ला विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौ. ज्योती भगवान कुवारे (वय २८ वर्ष) रा. चिखलगाव ता. जि. अकोला ह. मु. अनुराबाद ता. मलकापूर यांनी मलकापूर शहर पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १५ फेब्रुवारी २०२१ ते १८ डिसेंबर २०२४ दरम्यान आरोपी फिर्यादीचे पती भगवान रघुनाथ कुवारे (वय- ४० वर्ष), सासरे रघुनाथ विश्वनाथ कुवारे (वय ६५ वर्ष), सासु शोभाबाइ रघुनाथ कुंवारे (वय ६२ वर्ष) देर दुर्गेश रघुनाथ कुंवारे (वय ३७ वर्ष), देर परशुराम रघुनाथ कुंवारे (वय ३५ वर्ष), देर महादेव रघुनाथ कुवारे (वय ३० वर्ष) व नंनद शारदा विलास चव्हाण (वय ३८ वर्ष) रा. चिखलगावं ता. जि. अकोला हे माझ्या चारित्रावर संशय घेवून मला मारहाण करू लागले.

प्रलंबित मागण्यांसाठी ग्रामरोजगार सेवकांचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी १७ एप्रिल

मोताळा : ग्रामरोजगार सेवक संघटनेने मोताळा येथे एकदिवसीय धरणे आंदोलन छेडले आहे. पंचायत समिती प्रांगणात १६ एप्रिल हे आंदोलन करीत विविध प्रलंबीत मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनाला गटविकास अधिकारी अशोक काळे यांनी भेट दिली. त्यानंतर ग्राम रोजगार सेवकांच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद आहे की, रोजगार सेवकांचे मानधन वाढविणे, थकीत मानधन तात्काळ बँक खात्यात जमा करणे आणि 'फेस ऑथेंटिकेशन' (चेहरा ओळख) प्रणाली बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. मोताळा तालुक्यातील सुमारे ६५ग्रामरोजगार सेवकांना मागील १७ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही, अशी गंभीर बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्याची तरतूद असूनही, प्रत्यक्षात २ हजार रुपये इतकीच रक्कम दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उर्वरितथकीत रक्कम तात्काळ अदा करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही तर पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामरोजगार सेवक संघटनेने दिला आहे. निवेदनावर विठ्ठल दिघे, संदीप मापारी, रवि देशमुख, प्रफुल्ल घडेकर, प्रदीप सहावे, नवनीत शिरसाठ, भिमराव खराटे व तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सहाय्यक हजर होते.

अनेक रोजगार सेवकांना दिड वर्षांपासून मानधन न मिळाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांची वाताहत होत आहे. अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून आमच्या हक्काचे मानधन आम्हाला तातडीने द्यावे, अशी मागणी रोजगार सेवकांसह त्यांच्या कुटुंबियांकडून होत आहे.

शॉर्ट सर्किटमुळे मका पिकाला आग

बोरजवळा येथे सुमारे ४ लाखांचे नुकसान

प्रतिनिधी १७ एप्रिल

खामगाव : तालुक्यातील बोरजवळा शिवारात विद्युत शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत मका पिकासह सिंचन साहित्य जळून मोठे नुकसान झाले. या घटनेत शेतकरी बाळू झेलबा तोमर यांच्यासह इतर शेतकऱ्यांचे मिळून सुमारे ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मौजे बोरजवळा, गट क्रमांक १७६ येथील शिवारात गुरुवारी ही घटना घडली.

प्राथमिक माहितीनुसार, बाळू तोमर यांच्याकडे १.१० हेक्टर तर लिलाबाई झेलबा तोमर यांच्याकडे ०.८५ हेक्टर क्षेत्रात मका पिकाची लागवड होती. यापैकी सुमारे १.६० हेक्टर क्षेत्रावरील मका पिकाचे नुकसान झाले आहे. ठिबक सिंचन सुमारे २.०० हेक्टर क्षेत्रावर होते. तसेच ७५ मिमीचे २८ पाईप, ६३ मिमीचे ३४ पाईप व तुषार संचाच्या सुमारे ३० नोजल्स आगीत जळून नुकसान झाले. या घटनेत मका पिकाचे अंदाजे २.५० लाख रुपये, स्प्रिंकलर पाईपचे सुमारे ५० हजार रुपये, २ एकर ठिबक नळीचे ५० हजार रुपये आणि इतर साहित्याचे सुमारे ५० हजार रुपये असे एकूण अंदाजे ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. सिंचनासाठी वापरात असलेले साहित्यही आगीत नष्ट झाले. यात सुमारे ३० स्प्रिंकलर पाईप, २ एकरवरील ठिबक नळी तसेच इतर पाईपांचा समावेश आहे. याशिवाय, नाना झेलबा तोमर यांच्या १ एकर क्षेत्रातील ठिबक नळी व पाईपदेखील जळून नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच कृषी विभागाचे कृषी सहाय्यक एन. डी. कोळी, ग्राम महसूल अधिकारी वैशाली गवळी तसेच कॉम्रेड जितेंद्र चोपडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

वर्दडी बु. येथे मध्यरात्री 4 दुकाने फोडली

प्रतिनिधी १७ एप्रिल

बुलढाणा : किनगाव राजा परिसरातील वर्दडी बुद्रुक येथे मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी सलग ४ दुकाने फोडून सुमारे ६४ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ ते १६ एप्रिलच्या पहाटे दरम्यान चोरट्यांनी वर्दडी बुद्रुक येथील 'आराध्या मेडिकल अँन्ड जनरल स्टोअर्स' सह परिसरातील इतर दुकाने लक्ष्य केली. चोरट्यांनी दुकानांचे शटर उचकटून आत प्रवेश करून रोकड लंपास केल्याची माहिती आहे. या प्रकारात एकाच वेळी चार दुकाने फोडण्यात आली असून अंदाजे ६४ हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याचे सांगितले जात आहे. काही दुकानांच्या शटरचेही नुकसान झाले आहे. या घटनेमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरात यापूर्वीही किरकोळ चोरीच्या घटना घडल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून संशयितांचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

स्थानिक व्यापाऱ्यांनी रात्रीची गस्त वाढविणे, संशयितांवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षेच्या उपाययोजना अधिक प्रभावी कराव्यात, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

जुगार आणि सट्टेबाजीच्या जाळ्यात अडकल्या जात आहे युवा पिढी

सुरज बोराखडे १७ एप्रिल

खामगाव : तरुणाईचे लक्ष कष्ट न करता लवकर श्रीमंत होण्यावर आहे. कमी वेळात जास्त पैसे कमवण्याच्या इच्छेपोटी तरुण हा चुकीचा मार्ग अवलंबत आहेत. ऑनलाइन लॉटरी, गेम्स, जुगार, विविध स्पर्धांमध्ये पैसे लावून तरुण श्रीमंत होण्याच्या जाळ्यात अडकत आहेत. सर्व व्यवहार मोबाईलवर ऑनलाइन होत असल्यामुळे पालकांना याची कल्पनाच नाही असे दिसते.

आयपीएल सुरू असल्याने शहरातील बुकींच्या संख्येतही वाढ झाली आहे, कारण तालुक्यातील तरुण यांच्या मध्ये अडकले दिसत आहेत. वरली चा व्यवसाय भी तेजीत आहे आणि या डिजिटल युगात मोबाईल फोन आता प्रत्येकाच्या हातात आहेत. परिणामी, सर्व व्यवहार आणि आर्थिक व्यवहार मोबाईल फोनद्वारे केले जातात. कमीत कमी प्रयत्नांत श्रीमंत होने करता तरुण जुगाराकडे वळत आहेत. विविध खेळांच्या सामन्यांवर जुगार खेळला जात आहे. क्रिकेट स्पर्धांमध्ये कधी दोन, तर कधी फक्त एकच सामना असतो. यामुळे बुकी दररोज लाखो रुपये कमावतात. क्रिकेटमधील अनेक सामने शेवटच्या षटकापर्यंत चालतात, ज्यामुळे सट्टेबाजीच्या बाजाराला मोठी चालना मिळते. त्याचप्रमाणे, ऑनलाइन गेम्स आणि लॉटरीचा मोठ्या प्रमाणावर व्यापार होत आहे, परंतु या सापळ्यात तरुण उद्ध्वस्त होत आहेत. फोनपे आणि गूगल पे द्वारे ऑनलाइन पैशांचे व्यवहार केले जात आहेत. पोलिसांची दिशाभूल करून, सट्टेबाजी सुलभ करण्यासाठी बुकी दररोज आपली ठिकाणे बदलत आहेत.

उधारीच्या पैशावरून वाद ; कुटुंबाला सामूहिक मारहाण

प्रतिनिधी १७ एप्रिल

खामगाव: उधारीच्या पैशाच्या वादातून नागझरी खुर्द (ता. खामगाव) येथे एका कुटुंबावर नियोजित पद्धतीने सामूहिक हल्ला झाल्याची गंभीर घटना बुधवारी घडली. या प्रकरणी हिवरखेड पोलिस ठाण्यात आठ जणांसह इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रवीण प्रतापसिंग कटकवाड (वय २२, रा. नागझरी खुर्द) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. १५ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी अजय कोकरे याने उधारीच्या पैशाच्या कारणावरून फिर्यादीला चापट मारल्याने वादाला सुरूवात झाली. त्यानंतर रात्री ८ वाजता आरोपीने फिर्यादीच्या घरी जाऊन पुन्हा मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. रात्री ९.३० वाजता आरोपी अजय कोकरे याने आपल्या भावंडांसह व इतर नातेवाइकांना सोबत घेऊन फिर्यादीच्या घरासमोर जमाव जमविला. यावेळी लाकडी काठ्या व लोखंडी पाईपच्या साहाय्याने फिर्यादी, त्यांचे जावई गोकुळदास लिकडे आणि आई अनिता यांना बेदम मारहाण करण्यात आली, तसेच तिघांनाही शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी आरोपी अजय रामभाऊ कोकरे, अभय रामभाऊ रामभाऊ कोकरे, कृष्णा रामभाऊ कोकरे, हिमंत कोकरे, अभय सखाराम ठोंबरे, रोनित सखाराम ठोंबरे, इंद्रजीत वाघे व विवेक वाघे (सर्व रा. नागझरी खुर्द व गणेशपूर) यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

मोटारसायकलवरून पडून महिलेचा मृत्यू

मलकापूर : येथील रेखा गजानन सनानसे (३५) यांचा मोटारसायकलवरून पडून झालेल्या अपघातात मृत्यू झाल्याची घटना बुधवारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

रेखा सनानसे या त्यांचे पती गजानन वामन सनानसे यांच्यासह खामखेड रेल्वे स्थानकावरून सायंकाळी सुमारे ६ वाजता मोटारसायकलने देवधाब्याकडे परत येत होत्या. खामखेड रेल्वे स्थानकापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर आल्यानंतर त्या मागील सीटवरून घसरून खाली पडल्या. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. अत्यवस्थ अवस्थेत त्यांना तातडीने मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती फेंगडे यांच्या सूचनेनुसार कक्ष सेवक शेख तसलीम अब्दुल गणी यांनी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात माहिती दिली. त्यानुसार कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रशांत राठोड करीत आहेत. त्यांच्या पश्चात पती व दोन मुले आहेत.

हॉटेल, चहा टपरी, ढाबा चालकांना कमर्शियल सिलेंडर व केरोसीन तात्काळ उपलब्ध करा

उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी १७ एप्रिल

मलकापूर : मलकापूर व नांदुरा तालुक्यात सिलेंडरची भीषण टंचाई निर्माण झाली असून घरगुती तसेच कमर्शियल सिलेंडर मिळत नसल्याने मलकापूर, नांदुरा तालुक्यात गॅस धारकांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सी पुढे पहाटे सहा वाजेपासून सिलेंडर साठी भर उन्हात लाईन लावून नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागत आहे.तसेच व्यावसायिक सिलेंडर मिळत नसल्याने छोटे खानी हॉटेल, चहा टपरीधारक,धाबे वाल्यांचे रोजगार बंद झाले आहे. शासनाने डिझेल व पेट्रोल ही बाटली , कॅनमध्ये देणे बंद केले असल्यामुळे शेती मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांसमोर मोठा यक्ष प्रश्न उभा ठाकला आहे.केरोसीन ही उपलब्ध नसल्याने हॉटेल वाल्यांचे धंदे पूर्णतः बंद पडले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे तरी शासनाने या छोट्या हातमजुरी करणाऱ्या धंदेवाल्यांना केरोसीन उपलब्ध करून द्यावे व पेट्रोल पंप धारकांना शेतकऱ्यांना पेट्रोल डिझेल, कॅन, बाटलीमध्ये देण्याचे सुचित करावे अशी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांच्या मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास ,उप शहर प्रमुख बाळू पोलाखारे,किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार,उप तालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै.रहीम, शिवसेना नगरसेवक शेख निजामभाई, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी ,माजी न.प उपाध्यक्ष महादेव वनारे, माजी नगरसेवक पांडुरंग चिम,शेख मोहसीन सह शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यां नमूद आहे.

मलकापूर तालुक्यात लाखो रुपयांच्या ॲल्युमिनियम तारांची चोरी

प्रतिनिधी १७ एप्रिल

जांभुळधाबा, लोणवडी शिवारातील घटना; शेतीचा वीजपुरवठा ठप्प

मलकापूर : तालुक्यातील जांभुळधाबा आणि लोणवडी शिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घालत लाखो रुपये किमतीच्या ॲल्युमिनियम तारा चोरून नेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांसमोर संकट ठाकले आहे.

६ एप्रिलच्या रात्री ८ ते ७ एप्रिलच्या सकाळी ६ वाजताच्या सुमारास चोरट्यांनी लोणवडी शेत शिवारातील रोहित्रावरील २९३ गाळ्यांच्या ३ फेज ४ वायर अशा एकूण ६,९६० मीटर तारा चोरट्यांनी कापून नेल्या. तसेच जांभुळधाबा शिवारातील काशीनाथ मोरे यांच्या रोहित्रावरील ७,६८० मीटर आणि फिरके यांच्या रोहित्रावरील ३,८४० मीटर अशा एकूण १८,४८० मीटर ॲल्युमिनियम तारा चोरून नेल्या. त्यामुळे महावितरणचे सुमारे ९०,००० रुपयांचे नुकसान झाले असून, चोरट्यांनी घाईघाईत तारा काढताना तब्बल १० सिमेंटचे विद्युत खांबही जमीनदोस्त केले. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण ३ वितरण केंद्राचे प्रभारी कनिष्ठ अभियंता मंगेश प्रभाकर राणे यांनी मलकापूर ग्रामीण पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १३६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार सविता मोरे करत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट — संमिश्र

आता उष्माघातावर राहणार शहरी अन् ग्रामीण समित्यांचा 'वॉच'!

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : जिल्ह्यात सलग पाच दिवसांपासून तापमानाची उच्चांकी नोंद होत आहे. याची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी आढाव बैठक घेऊन शहर व ग्रामीण भागात महानगरपालिका आयुक्त व न.प.मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उष्मालाट नियंत्रणाच्या अनुषंगाने शहरी व ग्रामीण भागात समित्या स्थापन केल्या आहेत. त्या शहर व तालुक्यात उष्माताघाच्या उपाययोजना व परिस्थितीवर वॉच ठेवणार आहेत.

उष्मालाट लक्षात घेता जिल्ह्यात यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आली असून, आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांसाठी 'काय करावे? काय करु नये?' याबाबत सूचना जारी करण्यात आली आहे. नागरिकांनीही दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. उष्माघात उपाययोजना करण्याचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात १३ मार्च व १५ एप्रिल रोजी सर्व यंत्रणांची आढावा सभा घेऊन निर्देश देण्यात आले आहेत. उष्मालाट नियंत्रणाच्या अनुषंगाने आयुक्त महानगरपालिका यांच्या नियंत्रणात महानगरपालिका स्तरावर, सर्व मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेत नगरपालिका क्षेत्रामध्ये व सर्व तालुका गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेत ग्रामस्तरावर समित्या गठित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील खासगी शाळा, शिकवणी वर्ग याठिकाणी उष्मा लाटेच्या अनुषंगाने उपायुक्त यांनी भेटी द्याव्यात व आवश्यक सुविधाची तपासणी करावी. असे निर्देश देण्यात आले आहेत. आरोग्य विभागातील तयारीच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल स्टाफ यांचे उष्माघात उपाययोजनेबाबत प्रशिक्षण फेब्रुवारी व मार्चमध्ये पुर्ण करण्यात आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे आवश्यक खाटा, औषधसाठा उपलब्ध आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी पूर्ण वेळ उपस्थित आहेत. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय मुर्तिजापुर येथे तसेच जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथे उष्माघाताच्या अनुषंगाने शीतकक्षाची स्थापना करण्यात आली आहे.



जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश : प्रशासनाकडून 'डू अँड डोन्टस' जारी

सर्व प्राथमिक केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविदयालय येथे १३७ खाटा उष्माघात रुग्णांकरीता राखीव ठेवण्यात आले आहेत. सर्व आरोग्य रुग्णालयामध्ये उष्माघाताचे अनुषंगाने आयव्ही फ्लुईडस, आईसपॅक ओआरएस व इतर अनुषंगिक औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले.

अशी घ्यावी दक्षता

दुपारी १२.०० ते ४.०० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत, उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे, लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. आरोग्य विभागाच्या सुचनेनुसार अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

जे वर्ध्यात शक्य आहे ते अकोल्यात का नाही?

सलग पाच दिवसांपासून अकोल्याच्या तापमानाची नोंद सर्वाधिक तापमानाचे शहर म्हणून जागतिक पातळीवर झाली आहे. वर्धा जिल्हा प्रशासनाने तेथील तापमानाची वाटचाल ४४ अंशाकडे होताना दिसताच विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून तेथील अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्या तुलनेत अकोल्याचे तापमान अधिक असतानाही व पाच दिवसांपासून शहरवासीयांची ससेहोलपट होत असतानाही, वर्ध्यासारखा जिल्हा जे करू शकते ते आपण का नाही, असा संतप्त पालकांकडून उपस्थित होत आहे.

अकोला विभागासाठी 77 ई बसची मागणी

प्रतिनिधी १७ एप्रिल

◆ २३ बसेस प्रवाशांसाठी उपलब्ध

अकोला : अकोला विभागासाठी ७७ ई-बसची मागणी केली होती. यापैकी २३ बसेस दाखल झाल्या आहेत. उर्वरित ई-बस लवकरच दाखल होतील, अशी माहिती एसटीच्या विभाग नियंत्रक स्मिता सुतावणे यांनी दिली.

कौलखेड येथील ई-बस चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे, अकोला जिल्ह्यातील अकोट तसेच वाशिम आणि कारंजा लाड येथेही चार्जिंग स्टेशनचे काम वेगाने सुरू आहे. चार्जिंग स्टेशन लवकरच पूर्ण होतील. अकोला जिल्ह्यासाठी आणखी ई-बस दाखल होतील. आतापर्यंत दाखल झालेल्या बसपैकी काही १२ मीटर लांबीच्या तर काही ९ मीटर लांबीच्या आहेत.

अकोला ते पुणे, नांदेड, नागपूर, चंद्रपूर, हैदराबाद, छत्रपती संभाजी नगर, शिर्डी, नाशिक आणि इतर अनेक लहान-मोठ्या शहरांसाठी एसटी बसेस उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांसाठी पुढील महिन्यात आणखी बसेस सुरू केल्या जातील. ज्या छत्रपती संभाजी नगर, शिर्डी, नाशिक आणि इतर अनेक लहान-मोठ्या शहरांसाठी उपलब्ध राहतील. त्याचप्रमाणे, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांसाठी पुढील महिन्यात आणखी बसेस सुरू केल्या जातील, ज्या येथून छत्रपती संभाजी नगर, अकोट ते छत्रपती संभाजी नगर आणि अकोट ते नागपूर व नाशिकसाठी धावतील. त्याचप्रमाणे, मंगरूळपीर ते छत्रपती संभाजी नगर, नागपूर आणि नांदेडसाठी बसेस धावतील. विचारले असता, त्यांनी माहिती दिली की जिल्ह्यातील जवळपास सर्व गावांमध्ये एसटी बसेस धावतात. ज्या गावांमध्ये रस्ते आहेत, तिथे एसटी बसेस चालवल्या जात आहेत. प्रवाशांना उत्तम सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे स्मिता सुतावणे म्हणाल्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

अपघात मुक्त अकोला जिल्ह्यासाठी पोलिसांची विशेष मोहीम

दररोज नाकाबंदी व जनजागृतीवर भर

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : माननीय पोलीस महासंचालक यांनी नागपूर येथे घेतलेल्या बैठकीत सन २०२६ मध्ये १०३ प्रांतिक अपघात कमी करण्याबाबत सर्व ठाणेदारांना आदेशित करण्यात आले असून त्या बैठकीतील निर्देश व सूचनांच्या अनुषंगाने माननीय जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी पीएम राहत योजना, रहागीर योजना व वाहतूक सुरक्षितता संबंधाने मार्गदर्शन केले सन २०२५ च्या तुलनेत सन २०२६ मध्ये २५३ अपघात कमी करण्याच्या उद्देशाने दररोज प्रत्येक

पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी नाकाबंदी करून दररोज ठिकाण बदलून संध्याकाळी आठ ते रात्री दोन वाजेपर्यंत प्रभावी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले नाकाबंदी दरम्यान योग्य बॅरिकेटिंग करून अधिकारी व अंमलदार यांनी लाईट बॅटन रिफ्लेक्टर जॅकेट ब्लिंकर याचा वापर करावा. तसेच ब्रेथ एनालायझर मशीन द्वारे दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीमध्ये उपस्थित सर्व सदस्यांना पीएम राहत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत माननीय पोलीस अधीक्षक यांनी सूचना व मार्गदर्शन केले या योजनेअंतर्गत अपघात ग्रस्तांना दीड लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार उपलब्ध करून देण्यात येत असून अकोला जिल्ह्यातील ४२ रुग्णालय या योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत तसेच अपघातग्रस्तांना तात्काळ गोल्डन आवरमध्ये रुग्णालयात पोहोचविणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनातर्फे रहावीर योजना अंतर्गत २५ हजार रोख प्रोत्साहन पर बक्षीस देण्याचे प्रावधान आहे. अशा व्यक्तींना कोणत्याही प्रकारच्या पोलीस तपासाला सामोरे जावे लागणार नाही तसेच त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल माननीय पोलीस अधीक्षक यांनी अकोला जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करावी व पीएम राहत योजनेची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावी.

आरटीओ कार्यालयाच्या 105 सेवा एका क्लिकवर उपलब्ध

♦ तरीही नागरिक हेलपाटे मारण्यास बाध्य

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : आरटीओ कार्यालयाच्या १०५ सेवा आता एका क्लिकवर उपलब्ध आहेत. त्यामुळे पैसा व वेळेची बचत होते. परिवहन विभागाने आरटीओच्या सेवा ऑनलाईन केल्या आहेत, असे असले तरी नागरिकांची आरटीओ कार्यालयात कामे वेळेवर होत नाहीत. तसेच ऑनलाईन अर्ज केल्यानंतर कार्यालयाकडून वेळेत कार्यवाही होत नाही. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागतात. आरटीओ कार्यालया बाहेर एजंटांवर अंकुश लावण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला होता. परंतु ऑनलाइन काम होत नसल्याने अनेक जण वेळे अभावी कामे एजंटांना देतात. एजंट ऑनलाईन अर्ज दाखल करून ग्राहकांना सेवेचा लाभ मिळवून देतात. त्यामुळे आरटीओ कार्यालयात एजंटांची कामे झटपट होतात, तर सामान्य नागरिकांची कामे मात्र वेळेवर होत नसल्याचा अनेकांना अनुभव आहे. नवीन वाहनांची नोंदणी, वाहन मालकी हस्तांतरण, फिटनेस सर्टिफिकेट साठी अर्ज करणे, इ-चलान भरणे, वाहन टॅक्स भरणे, कागदपत्रांमधील बदल, नवीन लर्निंग लायसन्स काढणे, पक्क्या लायसन साठी अर्ज करणे, लायसनचे नूतनीकरण, लायसन वरील पत्ता बदलणे किंवा नाव दुरुस्त करणे, हरवलेल्या लायसन्स ऐवजी डुप्लिकेट लायसन मिळविणे आधी कामे ऑनलाईन करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांना रांगेत उभे राहण्याची वेळ येणार नाही असा दावा संबंधित विभागाने केला आहे. परंतु आज याउलट परिस्थिती पहावयास मिळत आहे. ऑनलाइन अर्ज केल्या नंतरही लोकांची कामे वेळेवर होत नसल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. लोकांकडे वेळ नसल्याने व ऑनलाईन कामे वेळेवर होत नसल्याने नागरिक मजबुरीने परत एजंटांकडे त्यांची कामे देत आहेत. ऑनलाइन सेवा पुरविणारे अनेक एजंट आरटीओ कार्यालय परिसरात कार्यरत आहेत. शासकीय शुल्काहून अधिक पैसे घेऊन ते सेवा पूरवित आहेत. त्यांची कामे लवकर आणि वेळेवर होतात. दुसरीकडे नागरिकांनी स्वतः अर्ज दाखल केल्यास वेळेवर काम होत नसल्याचा अनेकांना अनुभव आहे. ज्या उद्देशाने एजंटांना हद्दपार करण्यासाठी शासनाने ऑनलाईन प्रणाली लागू केली होती. परंतु त्याचा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे

शनिवारी वत्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला: कर्मयोगी शल्यविशारद डॉ. अरुण भागवत यांचे स्वप्नपूर्ती स्वरूप 'वत्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा शनिवार, १८ एप्रिल रोजी सकाळी ९:३० सर्वांच्या उपस्थितीत संपन्न होत असून यात आधुनिक व विविध उपचाराची सोय उपलब्ध करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

डॉ. अरुण भागवत यांनी आपल्या जीवन काळात निर्माण केलेल्या वैद्यकीय संकल्पनेचे रुग्णसेवेत निष्ठेने व आग्रहाने परिपालन केले. 'शिव भावे जीव सेवा' हे सेवाव्रत त्यांनी निष्ठेने आचरणात आणले. मेळघाट परिसरातील दुर्गम आदिवासी भागांमध्ये जाऊन अनेक व विविध व्याधी संबंधी शिबिरे आयोजित करून मोफत शल्यचिकित्सा व औषधोपचार यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले.अनेक अत्याधुनिक प्रगत तंत्रज्ञान त्यांनी वऱ्हाड परिसरात सर्वप्रथम उपलब्ध केले. दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया त्यांनी स्वतः आत्मसात करून प्रयोगात आणली. त्याचा फार मोठा फायदा वऱ्हाडातील रुग्णांना घेता आला. गोरक्षण रोड स्थित असलेले 'वत्सल हॉस्पिटल' डॉ. भागवतांनी नेहमीच आधुनिक स्वरूपात सर्व सोयींनी उपलब्ध केले. लोकार्पण होत असलेले 'वत्सल सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल' जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरून भव्य अशा वास्तुत बिर्ला कॉलनी, उड्डाणपूल जवळ, जठारपेठ येथे निर्माण केले. अशा या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा लोकार्पण सोहळा संपन्न होत आहे. डॉ. अरुण भागवत यांचे प्रतीच्या आपल्या भावना व्यक्त करण्याकरिता या लोकार्पण सोहळ्यास पालकमंत्री आकाश फुंडकर, खा अनुप धोत्रे, आ रणधीर सावरकर,आ साजिद खान पठाण,आ नितीन देशमुख,माजी मंत्री गुलाबराव गावंडे, अजहर हुसेन,माजी आ वसंतराव खोटरे, गजानन दाळू गुरुजी,गोपीकिशन बाजोरिया, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे,शेतकरी नेते प्रकाशभाऊ पोहरे, एपीएमसी. चे सभापती शिरीष धोत्रे हे प्रामुख्याने राहतील.डॉ. अरुण भागवत यांनी गेली ४५ वर्षे शल्यचिकित्सेद्वारे रुग्णांना अविरत आरोग्य सेवा दिली. या काळात त्यांनी

आपल्या कौशल्याने अनेक क्लिष्ट व गंभीर शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे फायदे आपल्या भागातील रुग्णांना मिळावेत हा त्यांचा मानस आणि दृष्टिकोन होता. या प्रेरणेतून या अत्याधुनिक हॉस्पिटलची निर्मिती झालेली आहे. 'वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल' च्या स्वरूपात त्यांचा हा मानस पूर्णत्वास येत आहे. या हॉस्पिटलच्या लोकार्पण सोहळ्यास अगत्यपूर्व उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. भागवत कुटुंबाच्या वतीने करण्यात आले.या पत्रकार परिषदेत यावेळी जेंष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ कल्पना भागवत, न्यूरो व स्पाईन सर्जन डॉ नरेंद्र भागवत ,पेन मॅनेजमेंट तज्ञ डॉ नम्रता भागवत,गेस्ट्रो व बेरीयट्रिक सर्जन डॉ अभिषेक भागवत, नेत्र तज्ञ डॉ हिता भागवत आदी उपस्थित होते.

अकोल्यात 14 लाखांचे एमडी ड्रग्ज हस्तगत !

१३ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : पोलिसांच्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने एमडी (मेफेड्रोन) या अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करत ६८.४३ ग्रॅम ड्रग्जसह १३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. २०२६ मधील एमडी ड्रग्जवरील ही पहिली मोठी कारवाई मानली जात आहे. यावरून

अकोला शहरातही एमडी ड्रग्जची नशा केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

१६ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. सिव्हील लाईन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नवीन बसस्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ एक व्यक्ती अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शासकीय पंचांच्या उपस्थितीत सापळा रचून छापा टाकला.

या कारवाईत मोहम्मद शफीक मोहम्मद जहिर शेख (३५, रा. मुंब्रा, जि. ठाणे) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ६८.४३ ग्रॅम एमडी ड्रग्ज (किंमत सुमारे १३ लाख ६० हजार रुपये) तसेच दोन (किंमत २० हजार रुपये) असा एकूण १३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये सिव्हील लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके व त्यांच्या पथकाने केली.

तेल्हाऱ्याला रेल्वे सुविधा कधी मिळणार ?

♦ जालना–खामगाव मार्ग हिवरखेडपर्यंत वाढवण्याची मागणी पुन्हा ऐरणीवर

विशाल नांदोकार१७ एप्रिल

तेल्हारा : स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही अकोला जिल्ह्यातील तेल्हारा शहर रेल्वे नकाशावर स्थान मिळवू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आजही नागरिकांच्या जिव्हारी लागणारी आहे. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या या भागाला आता रेल्वेची जोड मिळावी, यासाठी जालना–खामगाव प्रस्तावित रेल्वेमार्गाचा विस्तार शेगाव–तेल्हारा–हिवरखेडपर्यंत व्हावा ही मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी ठोस पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत असून, स्थानिक स्तरावरही या मागणीसाठी वातावरण तापू लागले आहे.

तेल्हारा, अकोट, बाळापूर तसेच बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील अनेक भाग आजही रेल्वे सुविधेपासून वंचित आहेत. परिणामी, येथील नागरिकांना शिक्षण, नोकरी, आरोग्यसेवा आणि व्यापारासाठी मोठ्या शहरांशी संपर्क साधताना अडचणींचा सामना करावा लागतो. तज्ज्ञांच्या मते, रेल्वे ही

केवळ वाहतुकीची सुविधा नसून, ती आर्थिक विकासाची जीवनवाहिनी आहे. अशा परिस्थितीत जालना–खामगाव मार्गाचा विस्तार हा संपूर्ण पश्चिम विदर्भासाठी 'गेमचेंजर' ठरू शकतो.

ही मागणी नवीन नसून, शेतकरी नेते स्व. प्रभाकरराव सावरकर यांच्या पुढाकाराने अनेक वर्षांपूर्वी या मार्गाचे सर्वेक्षणही करण्यात आले होते. बेलखेड परिसरात त्याचे ठसे आजही दिसून येतात. मात्र, त्यानंतर प्रकल्पाला गती मिळाली नाही. मध्यंतरी तेल्हारा रेल्वे कृती समितीनेही या प्रश्नावर पाठपुरावा केला होता, मात्र अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे आता पुन्हा एकदा सर्व स्तरातून एकत्रित प्रयत्नांची गरज व्यक्त होत आहे. हिवरखेड विकास मंच,

महत्त्वाच्या मागण्या

जालना-खामगाव मार्गाचा विस्तार हिवरखेडपर्यंत करावा, ६५ किमी नव्या मार्गासाठी सर्वेक्षण व निधी मंजूर करावा, अकोट-मुंबई 'मेळघाट एक्सप्रेस' सुरू करावी, अकोट-खंडवा-इंदोर गेज परिवर्तन पूर्ण करावे, अकोट-अंजनगाव-अचलपूर नवीन रेल्वेमार्ग मंजूर करावा, अकोला/अकोट ते दिल्ली-जम्मू सुपरफास्ट गाडी सुरू करावी, हिवरखेड येथे आधुनिक रेल्वे स्टेशन व मालधक्का उभारावा, डबल ट्रॅक व विद्युतीकरण पूर्ण करावे.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, स्थानिक सामाजिक संस्था तसेच नागरिकांनी या मागणीसाठी पुढाकार घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे बोर्ड तसेच मध्य व दक्षिण मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदने पाठविण्यात आली आहेत. याशिवाय, नगरपरिषद, ग्रामपंचायती व लोकप्रतिनिधी लवकरच ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

'मध्य रेल्वेच्या मुंबईतील बैठकीत या सर्व मागण्या ठामपणे मांडणार असून, लोकप्रतिनिधींनीही यासाठी पाठपुरावा करावा.'

श्याम आकोटकर,
झेडआरयुसीसी सदस्य

हा प्रकल्प पूर्ण झाल्यास संपूर्ण परिसराचा आर्थिक व सामाजिक विकास वेगाने होईल.

धीरज बजाज,
जिल्हाध्यक्ष, ग्रामीण पत्रकार संघ

या मार्गाचे सर्वेक्षण पूर्वी झाले होते, मात्र पुढे काहीच झाले नाही. आता हा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याची गरज आहे.

सत्यशील सावरकर,
ज्येष्ठ पत्रकार

परतवाडा येथील युवतींच्या लैंगिक शोषण प्रकरणातील दोषींना फाशीची मागणी

कठोर कारवाईसाठी निवेदन सादर

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : परतवाडा येथे उघडकीस आलेल्या धक्कादायक लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणात सुमारे १८० हून अधिक युवतींचे शोषण झाल्याची माहिती समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. मुख्य आरोपी मोहम्मद अयाज आणि त्याच्या साथीदारांनी शेकडो अश्लील व्हिडिओ बनवून ते प्रसारित केल्याच्या पार्श्वभूमीवर, दोषींना कठोर तपास करून फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

आरोपीने युवतींना प्रेमजाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केले आणि त्याचे चित्रीकरण करून त्यांना ब्लॅकमेल करणे, हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. हा केवळ वैयक्तिक गुन्हा नसून एका मोठ्या संघटित गुन्हेगारीचा भाग असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' आणि पीडितांमध्ये अल्पवयीन मुलींचा समावेश असल्याने 'पॉक्सो' कायद्यांतर्गत अत्यंत कठोर कारवाई करण्यात

यावी. या संपूर्ण प्रकरणातील आरोपींना आणि या रॅकेटला नेमके अर्थसाहाय्य कुठून मिळत होते, याची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल होत असताना पोलिसांनी स्वतःहून ('सुओ-मोटो') कारवाई का केली नाही? तसेच सुरुवातीच्या दिरंगाईमुळे मुख्य आरोपीला फरार होण्याची संधी कशी मिळाली, याची चौकशी व्हावी. हा खटला जलदगती न्यायालयात चालवून नराधमांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा मिळवून द्यावी. सायबर विभागाने तातडीने कारवाई करून सर्व प्लॅटफॉर्मवरून संबंधित व्हिडिओ हटवावेत आणि ते प्रसारित करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करावेत. पीडित युवतींची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवून त्यांना सुरक्षा प्रदान करावी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. या मुख्य विषयाव्यतिरिक्त हिंदु जनजागृती समितीच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांना आणखी दोन महत्त्वाच्या विषयांवर निवेदने सादर करण्यात आली. नाशिक शहर, जिल्हा आणि राज्यातील इतर शहरांमधील बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये सुरू असलेला 'कॉर्पोरेट जिहाद', हिंदू महिलांवरील अत्याचार आणि कामाच्या ठिकाणी केली जाणारी धार्मिक सक्ती यांविरुद्ध राज्य सरकारने कठोर कायदेशीर पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत राज्यातील ३०८ मदरशांना दिलेले ५० लाख रुपयांचे अनुदान त्वरित थांबवण्यात यावे. राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वाचे रक्षण करून एका विशिष्ट धर्माच्या संस्थांना दिले जाणारे हे अवाजवी अनुदान रद्द करावे, असे निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास हिंदु जनजागृती समिती आणि समस्त हिंदू समाजाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. निवेदन सादर करताना प्रा. हरिदास ठाकरे (शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान), ?ड. आनंद तायडे (विहिंप), ॲड. कल्याणी मित्रा, अश्विनी सरोदे (हिंदु जनजागृती समिती), अजय खोत (सनातन संस्था), योगेश अग्रवाल (सह-संयोजक, हिंदु राष्ट्र समन्वय समिती, अकोला), ॲड. श्रुती भट उपस्थित होते अशी माहिती हिंदु जनजागृती समिती, अकोलाचे समन्वयक अमोल वानखडे यांनी दिली.

दोन ठिकाणी जलवाहिनी फुटल्याने पिण्याच्या पाण्याचा अपव्यय

♦ अकोला- महान मार्गावर व्हॉल्व्ह निकामी झाल्याने गोड्या पाण्याची नासाडी

प्रतिनिधी १७ एप्रिल

अकोला : शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी दोन ठिकाणी फुटल्याने पिण्याच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय झाला आहे. एकीकडे भीषण उन्हाळ्यामुळे महान (काटेपूर्णा) धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असताना, दुसरीकडे अशा प्रकारे पाणी वाया जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. ही गळती त्वरित थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. अकोला शहर आणि अकोला-महान मार्गावर जलवाहिनीच्या गळतीमुळे पिण्याचे पाणी रस्त्यावरून वाहताना दिसले. अकोला शहरातील गजबजलेल्या टिळक रोडवरील बुलढाणा अर्बन बँक आणि ॲक्सिस बँकेसमोर जलवाहिनी फुटली. यामुळे मुख्य रस्त्यावर पाण्याचे लोंढे वाहत होते. या भागात उन्हाळ्यात आधीच पाणीटंचाई असते,

त्यात अशा प्रकारे पाणी वाया गेल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. अकोला-महान मार्गावर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीचा व्हॉल्व्ह फुटला. या व्हॉल्व्हमधून पाण्याचे कारंजे उडत होते आणि शेकडो गॅलन गोड पाणी रस्त्यावर वाया गेले. उन्हाळ्याच्या दिवसांत ग्रामीण भागात नागरिकांना पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागते. अशा परिस्थितीत शहरात होणारी पाण्याची नासाडी गंभीर समस्या निर्माण करत आहे. जलवाहिनी फुटल्यामुळे पाणी रस्त्यावरील दुकानं आणि घरांपर्यंत पोहोचले, ज्यामुळे परिसरात जलमय स्थिती निर्माण झाली होती. महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागाच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ही उघडपणे दिसणारी लापरवाही असून, संबंधित विभागाने तातडीने दुरुस्ती करून पाण्याची नासाडी थांबवावी, अशी मागणी अकोलेकरांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135